*(समाजशास्त्र विभाग),*

**प्रा. डॉ. भगवान शंकर वाघमारे**

*(लोकप्रशासन विभाग), कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी, आष्टी, ता.आष्टी जि.बीड*

---

**प्रास्ताविक :-**

तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील अग्रगण्य लेखक, साहित्यीक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पाहोचविणारा जातीवंत लेखक त्यांच्यात आढळून येतो. ग्रामीण बोलीभाषा आणि कला अवगत असलेले ते महान कादंबरीकार होते. कादंबरी, कथा, पोवाडा, लोकनाट्य या सर्व साहित्य प्रकाराला अण्णाभाऊंनी वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. पोवाडे, लावण्या, गीतं, पद या काव्यप्रकाराचा त्यांनी सामान्य जनतेत प्रचार आणि प्रसार केला. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यतोत्तर काळात राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांविषयी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती लढा, यामध्ये त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. ते अंतर्बाह्य मार्क्सवादी होते. विकासापासून वंचित आणि गावकुसाबाहेरचे हे दुर्लक्षीत व्यक्तीमत्व स्वयंप्रकाशीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर "जग बदल घालुनी घाव – सांगुनी गेले मला भीमराव" हे गीत असेल किंवा शाहीरी, पोवाडे, गाणी, तमाशा इत्यादीमध्ये त्यांनी स्वत:च्या साहित्यकृती निर्माण केल्या. हे सर्व साहित्य म्हणजे दीन-दलित, दुबळे, वंचीत, शोषित यांच्या आंतरात्म्याचे प्रकटीकरण होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांच्या सर्व साहित्यात समाजाचे वास्तव अधोरेखीत झालेले आढळून येते.

**- संशोधन निबंधाची उद्दिष्टये :-**

१) अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव शोधणे.

२) वेगवेगळया साहित्यप्रकारांविषयी त्यांची भूमिका समजून घेणे.

३) दलित, पिढीत, दुर्बल घटकांना दिलेले प्रतिनिधित्व अण्णा भाऊंच्या साहित्यात शोधणे.

४) समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अण्णा भाऊंच्या विचाराचा परामर्ष होणे.

५) अण्णा भाऊंचे विचार-दर्शन आणि रूद्यकालिन समाज यातील वास्तवता अभ्यासणे.

६) आण्णा भाऊंचे संपर्ण मराठी साहित्य समजून घेणे.

- विवरण आणि स्पष्टीकरण : -

**- अण्णाभाऊंवरील प्रभाव : -**

आई ही जगप्रसिद्ध कादंबरी लिहिलेले रशियन विचारवंत मॅक्झीम गॉर्की याचा प्रभाव अण्णा भाऊंवर पडलेला दिसून येतो. गॉर्की आणि अण्णा भाऊ या दोघांच्या विचारात खुपच साम्य मला आढळून येते. "समाज" या चालत्या-बोलत्या विद्यापीठातच दोघांचेही शिक्षण झाले. कष्ट करण्याची जिद्द आणि समाजवादी विचारसरणी हे आणखी काही पैलू त्यांच्या जीवनात आढळतात. त्यानंतर भारतीय सामाजिक विचारवंतामध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विचारवंताच्या विचाराचा आदर्श आणि प्रचंड प्रभाव अण्णा भाऊंवर पडलेला दिसूनर येतो.

**जीवनपरिचय :-**

तुकाराम उर्फ शाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म 01 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात वाटेगाव या लहान खेड्यात झाला. वडीलांचे नांव भाऊराव सिध्दोजी साठे व आईचे नांव वालुबाई होते. त्यांना एक भाऊ आणि एक बहीण होती. त्यांचे नावरस नांव तुकाराम ठेवले होते. आपण म्हणतो नावात काय आहे, परंतु प्रसिद्ध नाटककार-साहित्यीक विल्यम शेक्सपिअर म्हणतात नांवात बरेच काही असते. संत तुकाराम महाराजाप्रमाणेच या तुकारामाने आपल्या आयुष्यात मोठी समाजक्रांती घडवून आणली. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात, तसे वालूबाईच्या या लहान तुकारामाने संपूर्ण समाजाला हादरे देण्याचे कार्य केलेले आहे.

**अण्णा भाऊंच्या साहित्यातील समाज वास्तव :**

अण्णा भाऊ म्हणाले होते, "जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेलेत मला भिमराव". महात्मा ज्योतिबा फुले म्हणाले होते, "विद्येवीना मती गेली, मतीविणा गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले." डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "शिका संघटित व्हा। आणि संघर्ष करा।". या तत्कालीन विचारवंताच्या कार्याचा आणि विचारांचा वसा घेऊन अण्णा भाऊंनी समाज परिवर्तन घडवून आणले.

पावलो पावली ते संपूर्ण समाजाचा विचार करत असत. समाजात एक प्रकारची आस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखणीतून व विविध साहित्यप्रकारातून केला. त्यांच्या साहित्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा समावेश झालेला दिसतो. त्यांचे साहित्य हे इंग्रजी विचाराचे व उच्चवर्गाचे साहीत्य नाही. समाजातील शोषित, दलित, पिचलेला, दुर्बल समाज, त्यांच्या कथा कादंब-यात प्रस्तूत झालेला दिसतो. त्यांनी आपल्या साहित्यातील **"फकीरा"** या सामान्य कुळातील व्यक्तीला नायकत्व दिले. **"वैजयंता"** ही कादंबरी अशाच एका नवीन विषयाकडे आपणाला घेऊन जाते. तमाशा कलावंताचे शोषण समाज कशा प्रकारे करतो हे त्यांनी या कादंबरीत विस्ताराने मांडले आहे. आजही आपण पाहतो की समाज जेवढा सभ्यतेकडे (Civilized) वाटचाल करत आहे तेवढेच चारित्र्यहिन लोक आढळत आहेत. सभ्यता आणि चारित्र्य याचे प्रमाण व्यस्त(कमी) होताना आढळत आहे. आजच्या समाजातील वास्तवता अण्णा भाऊंच्या साहित्यामार्फत आपणाला समजून घ्यायची आहे. हा लेख प्रपंच करण्याचा मुख्य विषय हाच आहे.

**"माकडीचा माळ"** ही भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक जीवनांचे दर्शन घडवून आणते. खरे पाहता तर भटके विमुक्त समाज हे ब्रिटिश काळापासूनचे दुर्लक्षित व अविकसित घटक आहेत. त्यांना समाजाच्या वेशीवर आणण्याचे (अभ्यासातून) काम अण्णा भाऊंनी केलेले आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम ही कादंबरी करताना दिसते. आयुष्यभर एवढे मोठे साहित्यीक अण्णा भाऊ एका झोपडीत राहिले. कारण समाजातील त्यांचे बांधव ज्या हालाखीचे जीवन जगतात ते दु:ख, दारिद्र्य त्यांना जवळून पहायचे होते. त्यांना वाटले असते तर ते एखाद्या उच्चभ्रू वसतीत राहु शकले असते, परंतु त्यांनी तसे केले नाही.

बहुजनांची अस्मिता निर्माण करण्यात अण्णा भाऊंच्या साहीत्याचा मोठा वाठा आहे. समाजातील कष्टकरी, दलित, पिढीत, शोषित, शेतकरी, शेतमजूर, भटके-विमुक्त या सर्व समाजघटकांना त्यांनी आपल्या लेखणीने जागे केले. स्वत:चे अस्तित्व हारवून बसलेल्या समाजात नवजागृती निर्माण करण्याचे कार्य अण्णा भाऊंनी केले. या सर्व घटकाच्या हालअपेष्टा त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. यामुळेच त्यांच्या विचाराला दिशा मिळत गेली आणि त्यांचे साहित्य समृध्द होत गेले. माणूसकीचे हक्क नाकारणाऱ्या समाजातील प्रवृत्ती त्यांना संपवायच्या होत्या. त्यासाठी त्यांनी आपली लेखनी नेहमी तळपत ठेवली. मुळात अण्णा भाऊंची घडण हीच वेगळया पध्दतीने झाली होती.

ISBN : 978-81-938137-8-2

अण्णा भाऊंनी त्यांच्या साहित्याचा उपयोग समाजबांधणीसाठी केला. त्यांच्या साहित्याचा मूळ उद्देशच समाज प्रबोधन करुन समाजात नवचेतना जागृत करणे हा होता. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजनाचे माध्यम नव्हते, तर समाज प्रबोधन हा त्यांचा उद्देश होता. त्यांच्या साहित्यात नैतिकता आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून जाती-धर्माची बंधने तोडून सर्वांचा विकास घडवून आणता येईल यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. त्यामुळेच स्वत: कोणत्याही शाळेत वा विद्यापीठात न शिकलेली ही व्यक्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्य निर्माण करु शकली. शाळेत गेल्यावर पहिल्याच दिवशी मुळाक्षरे काढता आली नाहीत म्हणून वर्गशिक्षकाने शाळेतून मार देऊन बाहेर काढले, तेव्हाच त्यांनी ठरविले की आजपासून “समाज” हीच माझी शाळा आणि देशबांधवाचा उध्दार हेच माझे “विद्यापीठ”. सांगलीपासून मुंबईपर्यंत पायी प्रवास करुन त्यांनी मुंबई गाठली. कौटुंबिक जीवनात अनेक हालाकीची कामे केली. गिरणी कामगार म्हणून काम केले. जीवनातील हे कडुगोड अनुभव त्यांना पुढील आयुष्यात कामी आले. अन्यायाविरुद्ध चीड, झोकुण देण्याची वृत्ती, साधेपणा, बुध्दीचातुर्य या गुणांच्या जोरावर त्यांनी जगविख्यात साहित्य निर्मिती केली. कामगारांच्या दु:खाची जाणीव त्यांनी जवळून झाली. त्यांच्या साहित्याचा प्रभाव जनतेवर पडला, म्हणून आज आपण त्यावर आंतरराष्ट्रीय परिषद घेत आहोत.

**निष्कर्ष :**

मातंग समाजात जन्मलेले अण्णा भाऊ अल्पशिक्षित असले तरी त्यांच्या साहित्यामुळे ते समाजाच्या श्रेष्ठ साहित्यीकात गणले गेले. अण्णा भाऊंचे साहित्य हे अंतरमनाचा ठाव घेणारे व काळजाला भिडणारे आहे. समाजपरिवर्तन हा त्यांच्या साहित्याचा मानबिंदू होता. ग्रामीण, दलित, भटके-विमुक्त लोकांच्या जगण्याला योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे “मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील पण माणूस म्हणून जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच, आणि मला भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे. या विचाराने अण्णा भाऊ भारावले होते. त्यांच्या सर्व साहित्यातून समाज वास्तव चित्र त्यांनी रेखाटले आहे. अण्णा भाऊंनी उभ्या आयुष्यात दोन गोष्टीचा तीटकारा केला एक म्हणजे धर्म आणि बुवाबाजीपातून होणारी पिळवणूक. आण्णा भाऊंनी या दोन

ISBN : 978-81-938137-8-2

गोष्टीवर आपल्या लेखणीतून कोरडे ओढले. बहुजनांच्या या थोर साहित्यीकाचे 18 जूलै 1969 साली देहावसान झाले.

**संदर्भ साहित्य :-**

१) अण्णा भाऊ साठे चरित्र आणि कार्य – प्रा. विजयकुमार जोरणे
२) अण्णा भाऊ साठे – श्री. अर्जुन इंगळे
३) फकीरा – अण्णा भाऊ साठे
४) माकडीचा माळ – अण्णा भाऊ साठे
५) दै. लोकसत्ता लोकरंग पुरवणी

# SCHOLARS IMPACT
Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
*Special Issue*

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


**Volume-I, February 2019 (Special Issue)**


ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission


✤ EDITOR IN CHIEF ✤

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

✤ GUEST EDITOR ✤

**DR. BALASAHEB JADHAV**



www.scholarsimpact.com


: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

# UGC (CPE) SPONSORED

# ONE DAY INTERDISCIPLINARY

# NATIONAL LEVEL CONFERENCE ON

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM: CHALLENGES AND OPPORTUNITIES"

## 16th February, 2019

## -Organised By-

# Department of Political Science

M.S.P. Mandal's

# Shri Shivaji College, Parbhani.

International Multidisciplinary Online Research Journal

**Approved By UGC Journal No-41129**

**Volume –I, February, 2019**

# SCHOLARS IMPACT

**QUARTERLY**

An Internationally Indexed, Refereed, Peer Reviewed, Quarterly Online and Open Access Journal

**IMPACT FACTOR- 5.98**

## SPECIAL ISSUE

**ON**

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM: CHALLENGES AND OPPORTUNITIES"

*EDITOR IN CHIEF*

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

**www.scholarsimpact.com**

EDITOR IN CHIEF

**DR. M. RAGHIB DESHMUKH**
G. S. SCI, ARTS & COM, COLLEGE KHAMGAON
DIST. BULDANA (INDIA)

EDITOR

**DR M. TALIB DESHMUKH**
Retired Professor
G. S. SCI, ARTS & COM, COLLEGE KHAMGAON
DIST. BULDANA (INDIA)

## ASSOCIATE EDITORS

| | |
|---|---|
| DR. ANZARUL HAQUE KHAN<br>PROFESSOR<br>DEPARTMENT OF CHEMICAL AND BIOLOGICAL ENGINEERING<br>KOREA UNIVERSITY, SEOUL | DR. GEHAN ESMAIELDEEB<br>LECTURER<br>DEPARTMENT OF ENGLISH<br>OCTOBER 6 UNIVERSITY, GIZA<br>EGYPT |
| DR. AMNA MIRZA<br>ASSISTANT PROFESSOR<br>DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE<br>UNIVERSITY OF DELHI<br>(INDIA) | DR. RAVINDRA P. BHANAGE<br>ASSOCIATE PROFESSOR<br>DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE<br>SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR<br>(INDIA) |
| DR V. L. BHANGDIA<br>PRINCIPAL<br>SMT. KESHARBAI LAHOTI MAHAVIDYALAYA, AMRAVATI<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI | DR. DHANANJAY S. TALWANKAR<br>PRINCIPAL<br>G. S. SCIENCE, ARTS AND COMMERCE COLLEGE, KHAMGAON<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI |
| DR. DEVENDRA N. VYAS<br>PRINCIPAL<br>R. D. G. COLLEGE FOR WOMEN, AKOLA<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI | NAWAB ALI KHAN<br>PROFESSOR<br>AL- KHARJ SALMAN BIN ABDULAZIZ UNIVERSITY<br>(KINGDOM OF SAUDI ARABIA) |

| | |
|---|---|
| PROFESSOR ABDUR RAHEEM KIDWAI<br>DIRECTOR<br>UGC HUMAN RESOURCE DEVELOPMENT CENTRE<br>AMU, ALIGARH | PROFESSOR BADIUDDIN AHMED<br>DEAN<br>SCHOOL OF COMMERCE & BUSINESS MANAGEMANT<br>MANU UNIVERSITY, HYDERABAD |
| ASMA R. DESHMUKH<br>GUEST FACULTY<br>S. R. M. MAHILA MAHAVIDYALAYA,<br>KHAMGAON DIST. BULDANA<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI | DR. FAIZA ABBASI<br>ASSISTANT DIRECTOR<br>UGC HUMAN RESOURCE DEVELOPMENT CENTRE<br>AMU, ALIGARH |
| DR. NITEEN V. PHIRKE<br>PROFESSOR & HEAD<br>DEPARTMENT OF MICROBIOLOGY<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI | DR. G. L. GULHANE<br>HEAD<br>DEPARTMENT OF EDUCATION<br>S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI |
| DR. REETESH SAH<br>ASSISTANT DIRECTOR<br>UGC- ACADEMIC STAFF COLLEGE<br>KUMAUN UNIVERSITY, NAINITAL | DR. NAZIA A. RASHIDI<br>HEAD, DEPARTMENT OF CHEMISTRY<br>M. M. COLLEGE, DARWHA DIST.<br>YAVATMAL(INDIA) |
| ZAKIR KHAN SALAM KHAN<br>ASSISTANT PROFESSOR<br>DEPARTMENT OF PHYSICS<br>GOVERNMENT VIDARBHA INSTITUTE OF SCIENCE & HUMANITIES, AMRAVATI | DR. KUSUM KASHYAP<br>DEPARTMENT BOTANY<br>GOVT. MAHARAJA COLLEGE,<br>CHHATARPUR(M.P.)<br>BUNDELKHAND UNIVERSITY (INDIA) |

*MANAGING EDITOR*

**DR. M. AAQIB DESHMUKH**

ASSISTANT PROFESSOR
Smt. KESHARBAI LAHOTI MAHAVIDYALAYA
AMRAVATI
S. G. B. AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI (INDIA)

## MEMBERS OF EDITORIAL BOARD

| | |
|---|---|
| DR. LOO FUNG YING<br>Malaysia | DR. LOO FUNG CHIAT<br>Malaysia |
| JOHN KAISER S. CALAUTIT,<br>UK | BENSAFI ABD-EL-HAMID<br>Algeria |
| RÉAGAN LORRAINE LAVORATA,<br>France | DR. SUMA PARAHAKARAN<br>Malaysia |
| DR. ANJALI HANS<br>Dammam | AZIZUR RAHMAN FALAHI<br>Malaysia |
| MR. SHAFEEQUE AHMED<br>Saudi Arabia | DR. JAKE M. LAGUADOR<br>Philippines. |
| DR. PRAFULLA V. UBALE<br>India | PRITHVIRAJ SINGH P. THAKUR<br>India |
| DR. REYNALDA B. GARCIA<br>Philippines | SANDA MAICAN<br>Romania |

## DISCLAIMER:

The views articulated in the journal are those of author(s) and not the Publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editors or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work. The Publisher/Editor/Printer does not take responsibility for issues related to intellectual property, copy right or other matters. All the disputes related to research demagogue will come under the jurisdiction of Khamgaon court only. The names in all the boards with asterisk are to be considered only for this special issue. © The articles/papers published in the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.

**Published By:**

**DESHMUKH PUBLICATIONS, PVT. LTD.**

Printed & Published by Dr. M. Talib Deshmukh & Edited by Dr. M. Raghib Deshmukh,
Deshmukh Publication Pvt. Ltd.
"Soyba Villa" Beside "Deshmukh Hospital" Millat Colony, At. Khamgaon Dist. Buldana
(Maharashtra) India -444303 Cell No- +91-9422926544
Email:- scholarsimpact@yahoo.com, ragibdeshmukh@gmail.com
Web: www.scholarsimpact.com

# CONTENTS



| Sr. No. | Research Papers | Page No. |
|---|---|---|
| 1. | Pak Militancy Destroying The Unity Integrity of Kashmiris<br>**Dr. Jiji Paul S** | 01-04 |
| 2. | Terrorism As An Obstacle In Democracy of India<br>**Shabir Ahmad Dar** | 05-08 |
| 3. | The Role of Media In Indian Democracy<br>**Mohd Ayub Mir** | 09-12 |
| 4. | Reliable Contribution of Mathematics In Democratic System<br>**Dr C. D. Bele** | 13-16 |
| 5. | Historical Background of Human Rights In Ancient India And Indian Constitution<br>**Mr. Mahesh S Jadhav** | 17-19 |
| 6. | Concept of Democracy And Challenges Before Indian Democracy<br>**Dr.Wahida Shaikh** | 20-24 |
| 7. | Human Rights And Contemporary Status of Indian Women<br>**Dr. Sunil V. Shinde** | 25-27 |
| 8. | Indian Democracy And Human Rights<br>**Dr. Anita Rajesh Deshmukh** | 28-29 |
| 9. | A Study of New Challenges of Indian Democracy : Social Media In Politics<br>**Dr. Laxman Popatrao Wagh** | 30-40 |
| 10. | Women's Empowerment Through Political Participation In India<br>**Dr. Ahmad Shamshad** | 41-47 |

| | | |
|---|---|---|
| 61. | दहशतवाद : भारतीय लोकशाही पुढील आव्हान<br>प्रा. औचित्ये डी.सी. | 218-223 |
| 62. | बहुसंख्यांच्या धार्मिक जातीय विळख्यात भारतीय लोकशाही<br>डॉ. आर.व्ही. मस्के | 224-226 |
| 63. | भारतीय लोकशाही आणि आतंकवाद : विशेष संदर्भ जम्मू आणि काश्मीर<br>राजेश जोंधळे | 227-230 |
| 64. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा डॉ दत्ताजी मेहत्रे | 231-235 |
| 65. | भारतीय लोकशाही आणि संविधानिक मूल्य<br>प्रा. डॉ. एम. एफ. राऊतराहे | 236-238 |
| 66. | भारतीय लोकशाही पुढील आव्हान : प्रादेशिकता<br>संभाजी तांबे | 239-242 |
| 67. | भारतीय लोकशाही : संवैधानिक मूल्ये आणि वास्तव<br>डॉ. फोले एस. के. | 243-247 |
| 68. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>प्रा. राजा मनोहर इंगळे, प्रा. किशोरकुमार मनोहर इंगळे | 248-251 |
| 69. | सोशल मिडियाचा वापरकर्त्यांवर होणारा प्रभाव-बारामती शहरातील वापरकर्त्यांचा अभ्यास<br>देविदास विजय भोसले | 252-254 |
| 70. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>प्रा. भोसले वैशाली भानुदास | 255-257 |

| | | |
|---|---|---|
| 71. | लोकशाही आणि महिलांचे राजकीय सहभागीत्व<br>प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण | 258-261 |
| 72. | भारतीय लोकशाही आणि नीती आयोगाची भूमिका<br>गवळी देविदास गोकुळ | 262-266 |
| 73. | भारतातील प्रादेशिकवादाचे स्वरुप<br>डॉ. पी. डी. सूर्यवंशी | 267-269 |
| 74. | भारतीय लोकशाही आणि दहशतवाद व उपाय<br>मा. डॉ. डि. आर. भागवत, प्रा. वाघमारे नागोराव संभाजी | 270-273 |
| 75. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने:चिकित्सा<br>डॉ. हनुमंत कुरकुटे | 274-280 |
| 76. | भारतीय लोकशाही आणि आजचा खेळाडू<br>प्रा. पल्लेवाड भारत विठ्ठलराव | 281-283 |
| 77. | भारतीय लोकशाही आणि दहशतवाद<br>प्राचार्य डॉ शरद कुलकर्णी, सुरेश हिवाळे | 284-285 |
| 78. | लोकशाहीतील सक्षम नागरीक घडविण्यासाठी शारिरीक शिक्षक व खेळाचे महत्व<br>प्रा.संतोष बाबुराव कोकीळ | 286-288 |
| 79. | भारतीय लोकशाही व प्रसारमाध्यमांची भूमिका<br>डॉ. भगवान शंकरराव वाघमारे | 289-292 |
| 80. | भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार<br>डॉ. प्रा. दिलीप ह. सूर्यवंशी | 293-296 |

| | | |
|---|---|---|
| 81. | लोकशाही आणि सुशासनात नागरी समाजाची भूमिका<br>प्रा.डॉ. प्रभाकर ग. जाधव | 297-301 |
| 82. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>अनघा अशोक पेंढारी | 302-303 |
| 83. | भारतीय लोकशाही आणि नीती आयोगाची भूमिका<br>डॉ. फुके मयुरी राजेश्वर | 304-306 |
| 84. | भारतातील भ्रष्टाचार निर्मुलनासाठीची लोकपाल संस्था<br>डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर | 307-310 |
| 85. | भारतीय लोकशाही व मानव अधिकार<br>डॉ. बी. बी. लोखंडे | 311-314 |
| 86. | लोकशाही आणि प्रसार माध्यमे - एक अभ्यास<br>प्रा. माणिक भि. डोखळे | 315-317 |
| 87. | भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार<br>प्रा. डॉ. मानवते उत्तम हुसनाजी | 318-320 |
| 88. | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने व उपाययोजना<br>प्रा. डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ, डॉ. बाळासाहेब भिंगोले | 321-323 |
| 89. | भारतीय लोकशाहीचा ऐतीहासिक आढावा<br>प्रा. नामदेव तुकाराम मोरे | 324-325 |
| 90. | लोकशाही शासन व्यवस्थेचे भवितव्य<br>प्रा. संजय मोहाडे | 326-328 |

| | | |
|---|---|---|
| 91. | भारतीय लोकशाही आणि सुशासन<br>प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे | 329-331 |
| 92. | लोकशाही आणि प्रांतीय अस्मिता<br>प्रा. डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे | 332-334 |
| 93. | मानवेंद्रनाथ रॉय यांचे लोकशाही संबंधी विचार<br>प्रा. डॉ. पांचाळ अविनाश भगवानराव | 335-339 |
| 94. | 21 व्या शतकातील दहशतवाद आणि भारतीय लोकाशाही<br>प्रा. एस. आर. पाटील | 340-342 |
| 95. | लोकशाही मूल्य और दामोदर मोरे जी की कविता<br>प्रा. डॉ. संजय जाधव | 343-351 |
| 96. | राजनीति में महिला आरक्षण का भारतीय लोकतंत्रपर प्रभाव<br>भालेराव सुधाकर नारायण | 352-354 |

(79)

# भारतीय लोकशाही व प्रसारमाध्यमांची भूमिका

डॉ. भगवान शंकरराव वाघमारे
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी जि. बीड

**प्रास्ताविक:** जागतिक स्तरावर शासन व्यवस्थेच्या विविध प्रकारापैकी लोकशाही शासन व्यवस्था अत्यंत परिणामकारक व प्रभावशाली शासन व्यवस्था म्हणून मान्यता मिळाल्याचे दिसून येते. राजेशाही, सरंजामशाही, लष्करशाही, हुकूमशाही व भांडवलशाही व्यवस्थेत जनतेच्या मतास दुय्यम स्थान असते, तर लोकशाही शासन व्यवस्थेत जनमतास प्रथम प्राधान्य दिले जाते. किंबहुना जनकल्याण हाच लोकशाही शासन व्यवस्थेचा गाभा असतो. याची प्रचिती भारतीय शासन व्यवस्थेतून कायम येत असते, याचे कारण भारताने प्रजासत्ताक गणराज्य स्वीकार संसदीय लोकशाही अंगीकारली आहे हेच असल्याचे स्पष्ट होते.

लोकशाही शासन व्यवस्थेत सामूहिक व न्यायोचित निर्णयांना अधिक महत्त्व असते. ज्या निर्णयातून सर्वांचे हक्क जोपासले जाऊन जनमताचा विचार होतो. अशा सामूहिक निर्णय प्रक्रियेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जनतेचे नियंत्रण असते. भारतीय लोकशाहीत सार्वजनिक निवडणुकीच्या माध्यमातून जनतेचे प्रतिनिधी निवडले जातात. याच जनप्रतिनिधीमार्फत सरकार चालविले जाते. अशा लोकशाही राष्ट्रात निवडणुका या निरंतर चालू असतात. विशिष्ट कालावधी संपल्यानंतर नवीन सरकार अस्तित्वात येते, ज्यांच्यामार्फत लोककल्याणाची कामे केली जातात.जगप्रसिद्ध विचारवंत अब्राहम लिंकन यांच्या मते," लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी चालविलेले लोकांचे राज्य होय. (By the people, of the people, for the people)" ज्यात लोकप्रतिनिधीमार्फत जनतेच्या कल्याणाचे व हिताचे निर्णय घेतले जातात. अशा लोकशाही शासन व्यवस्थेत व्यक्तिगत हितापेक्षा सामूहिक हिताला प्राधान्य दिले जाते. भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत जनता ही मालक असल्याने सरकारला जनताभिमुख निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध राहणे गरजेचे आहे. सशक्त लोकशाहीच्या अस्तित्वासाठी ज्या पद्धतीने कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळाचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे असते त्याप्रमाणेच निर्भीड व निःपक्षपाती प्रसारमाध्यमांची भूमिका असणे ही तितकेच महत्त्वाचे असते. म्हणून प्रसारमाध्यमाकडे भारतीय लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पाहिले जाते. शासनाची विविध कायदे, नियम, धोरणे, निर्णय व योजना यांची अंमलबजावणी प्रभावीपाने व्हावी, जनमानसाच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, तसेच जनता व शासन यांच्यात सहकार्य, समन्वय व विश्वासहर्ता वृद्धिंगत व्हावी या दृष्टीने प्रसारमाध्यमांची भूमिका ही तेवढीच महत्त्वाची मानली जाते. शासनाच्या योजना जनतेपर्यंत घेऊन जाणे व त्याचे महत्त्व सामान्यांना पटवून देणे या संबंधीचे कामे प्रसमाध्यमकडून अपेक्षित असतात. तसेच जनतेचे विविध प्रश्न व समस्या ययांची गांभीर्याने दखल घेऊन सरकारला जागे करण्याचे काम देखील तेवढेच किफायतशीरपणे प्रसारमाध्यमांना करावे लागते.

**भारतीय लोकशाहीचे महत्त्व:**

**१. एक मत एक मूल्ये:**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय नागरिकांना एकच मतदानाचा अधिकार दिला आहे. अशी लोकशाही व्यवस्था निर्माण करून दिली आहे. देशातील गरीब, श्रीमंत शेतमजूर, उच्यशिक्षित, राजकीय नेते, अशिक्षित, भूमिहीन, गर्भश्रीमंत व्यक्ती, उधोगपती, शोषित, पीडित व वंचित घटक व शेतकरी यांच्यासह अन्य कोणतीही व्यक्ती असेल तरी त्यांच्या मताचे मूल्ये हे समान असेल. प्रत्येक व्यक्ती जी भारतीय नागरिक असेल त्यांच्या मताला समान स्थान असणार आहे. त्यातून भारताच्या लोकशाहीचे महत्त्व आधोरेखित होते.

**२. मूलभूत हक्क व कर्तव्य:**

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांना मूलभूत हक्क मिळाले आहेत व त्याच बरोबर कर्तव्ये ही सांगितली गेलीत. या मूलभूत हक्क व कर्तव्यातून भारतीय लोकशाहीला अधि ...न प्राप्त झाले आहे. विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संचाराचे स्वातंत्र्य, समान संधी, एकत्र येऊन विचार मांडण्याचे स्वातंत्र्य व वयक्तिक सुरक्षेचे स्वातंत्र्य सर्वाना मिळाल्यामुळे लोकशाहीचे महत्त्व अधिक स्पष्ट अधोरेखित होताना दिसून येते.

**३. निवडणुका, जनप्रतिनिधी व लोकमताचा प्रभाव:**

भारताच्या सांसदीय लोकशाहीमध्ये निवडणुकांना महत्त्वाचे स्थान आहे. निवडणुकांच्या माध्यमातून ज्या पक्षाचे व घटक पक्षांचे बहुमत सिद्ध होते त्यांना सत्ता स्थापनेचा दावा करता येतो. लोकशाही शासन व्यवस्थेत जनतेमधून लोकप्रतिनिधी निवडले जाऊन अप्रत्यक्षपणे जनतेचे सरकार स्थापन केले जाते. हे जनतेचे प्रतिनिधी सरकारच्या माध्यमातून जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यास जबाबदार असतात. जनप्रतिनिधीकडून लोकमताचा आदर होणे अपेक्षित असते. अन्यथा पुढील निवडणुकीत जनता निष्क्रिय सरकारला पायउतार होण्यास भाग पाडते. एकंदरीत लोकशाही शासन व्यवस्थेत जनमताचा प्रभाव अधिक स्पष्ट दिसून येतो. म्हणून निवडणुका, लोकप्रतिनिधी व लोकमत हे लोकशाहीचे अविभाज्य घटक समजले जातात.

**४. सामाजिक, वैज्ञानिक, आर्थिक सांस्कृतिक व विकासात्मक महत्त्व:**

लोकशाही शासन व्यवस्थेच्या सवांर्धनासाठी शासन व प्रशासनाचा दृष्टिकोन सर्वव्यापी असणे गरजेचे असते. शासनाला विविध पातळीवरून कामे पार पाडावी लागतात. धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक विविधतेने नटलेला भारतीय जनतेस विकासाच्या प्रवाहात आणत असताना सकारात्मक दृष्टिकोन वृद्धिंगत करून विज्ञान व तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. समाजातील विविध घटकांना विकासाच्या प्रवाहात कसे आणता येईल व त्यातून आर्थिक उन्नती कशी साधता येईल याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असते. भारताला जागतिक स्पर्धेत टिकून राहावयाचे असेल तर प्रत्येकांनी आपले योगदान राष्ट्राच्या प्रगतीसाठी देणे अनिवार्य आहे. हाच लोकशाहीचा मूलाधार आहे ते विसरून चालणार नाही.

**सशक्त लोकशाहीच्या अस्तित्वासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका:**

लोकशाही शासन व्यवस्थेत प्रसार माध्यमांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. त्याअनुषंगाने प्रसारमाध्यमांना समाजमनाचा आरसा म्हणून ही संबोधले जाते. आज शासनाच्या उदारमतवादी

धोरणामुळे जग जवळ आले व माहितीचे प्रचंड जाळे निर्माण झाले. देशात मोठ्या प्रमाणात विविध वाहिन्या, वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ यांची संख्या वाढलेली दिसून येते. पत्रकारिता या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. पत्रकारितेची उपयुक्तता स्पष्ट करताना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणतात की, "सेवा हाच पत्रकारितेचा हेतू असला पाहिजे. लोकमत जाणणे आणि या समाजमनाला निश्चित व निर्भय वाचा देणे हेच पत्रकारितेचे खरे कार्य असते. सत्य जाणणे हा लोकांचा हक्क असतो. के घडत आहे याची वस्तुनिष्ठ माहिती लोकांना मिळालीच पाहिजे. पत्रकारितेत सत्ता दडलेली असते तिचा दुरुपयोग हा गुन्हाच असतो."

इंग्रजी भाषेतील Media या शब्दाचे भाषांतर म्हणून माध्यम हा मराठी शब्द सध्या वापरात आहे. त्याआधी पत्रकारिता (Press) हा शब्द रूढ होता. Media ही संकल्पना अतिप्राचीन असून तिची मुळे असिरियन साम्राज्यात आहेत. सोळाव्या शतकातील Medius, medium पासून Media बहुवचनी शब्द बनतो. तार, दूरध्वनी, टपाल सेवा यांना उद्देशून जनसंवाद, लोकसंपर्क या अर्थाने Media हा शब्द १९१९ साली ए. जे. वूल्फ या व्यापारविषयक अभ्यासकाने त्याच्या 'थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ इंटरनॅशनल कॉमर्स' या पुस्तकात वापरला. नभोवाणी, चित्रपट आणि वृत्तपत्रे यांच्यासाठी mass media हा शब्द १९२३ च्या दरम्यान आणि १९४६ नंतर news media हा शब्द उपयोगात आला. विसाव्या शतकाच्या अखेरीस social media ही संकल्पना रुळली.

अलीकडील काळात प्रसारमाध्यमांची व्याप्ती अधिक वाढत असल्याचे निदर्शनास येते. प्रसारमाध्यमांना वस्तुनिष्ठता, पारदर्शकता, विश्वासहर्ता, लोकशाहीचा चौथा स्तंभ, सामाजिक जाणिवा, सामाजिक उत्तरदायित्व, परिणामकारकता, तत्परता अशा विविध कसोट्यावर उतरून कामे करावी लागतात. वस्तुनिष्ठ पत्रकारिता केवळ लोकशाही शासन व्यवस्थेतच शक्य असते. लष्करशाही, हुकूमशाही, राजेशाही, अध्यक्षीय व धार्मिक राष्ट्रात ती शक्य नसते. लोकशाही कितीही दोषपूर्ण असली तरी सर्वसामान्यांना मत स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणारी जीवनपद्धती असल्याने तीच पत्रकारितेला पूरक असते. विरोधाभास असा की, लोकशाहितच पत्रकारितेचे किंवा प्रसार माध्यमांचे नैतिक प्रश्न जास्त असतात. त्यामुळे माध्यमांचे नैतिकशास्त्र लोकशाहीत जास्त उचित व महत्त्वाचे ठरते.

अमेरिकन विचारवंत जेफरसन यांच्या मते, 'लोकशाहीला सर्वात महत्त्वाचं कवच कोणतं असं मला विचाराल तर मी निःसंशय वृत्तपत्र हेच चांगलं कवच आहे असं उत्तर देईन.' हे विधान प्रसारमाध्यमांचे महत्व समजावून घेण्यासाठी अत्यंत बोलका आहे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्राचे महत्व अधोरेखित करताना स्पष्टपणे म्हणतात की, "एखाद्या चळवळीला वृत्तपत्राची जोड नसेल तर त्या चळवळीची अवस्था पंख छाटलेल्या पक्षाप्रमाणे होते." यावरून वृत्तपत्र किंबहुना प्रसार माध्यमांची भूमिका किती महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. परंतु हे सर्व प्रसार माध्यमे जागरूक असणे तसेच विश्वासपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे हे देखील तेवढेच महत्वाचे आहे. आज घडीला अनेक वाहिन्या, वर्तमानपत्र आपल्या व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून चुकीच्या गोष्टीचे समर्थन करतात. असा आरोप जनसामान्यातून होताना दिसून येतो. फसव्या जाहिराती, लोकशाहीस मारक असणाऱ्या बाबींचे समर्थन करून आपल्या पारदर्शकतेबद्दल, हेतूबद्दल, उत्तरदायित्वबद्दल प्रश्नचिन्ह उभे करून बसत असल्याचे दिसून येते. पेड न्यज, क्राइम, पेज थ्री कल्चर, सिनेमा यातून सामाजिक स्वास्थ टिकून राहण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. मोबाईल, टेलिफोन, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप यांचा

झपाट्याने वेग वाढत असला तरी त्यांच्या योग्य वापराबाबत व उद्देशाबाबत अधिक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत अशी आव्हाने काही लोकशाही माध्यमासमोर दिसून येतात.

**निष्कर्ष:**

भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेत शासन व जनता यांच्यात माहितीचा दुवा म्हणून प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आज जागतिकीकरणाच्या युगात जीवन अत्यंत गतिमान बनत असल्याने शासन व प्रशासनास ही एक पाऊल पुढे टाकून कामे करावी लागत आहेत. त्यांच्या या कामात प्रसार माध्यमांची भूमिका स्पष्टपणे सकारात्मक होत असल्याचे दिसून येते. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून जनतेला शासनाच्या योजनांची व विकासासंबंधीत प्रभाव टाकणाऱ्या निर्णयाची तात्काळ माहिती मिळते. उलटपक्षी जनतेच्या समस्या देखील शासन दरबारी कमीअधिक प्रमाणात माध्यमाच्या - आधारे मांडल्या जात आहेत म्हणून भारतीय लोकशाहीत प्रसार माध्यमांचे महत्त्व अनन्यसाधारण दिसून येते. असे असले तरी प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता, त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन, पारदर्शकता दबावाला बळी पडणे, वस्तुनिष्ठता याबाबत सामान्य जनतेच्या मनात संशय दिसून येतो हे देखील तेवढेच महत्वाचे आहे या सर्व आव्हाने व कसोट्यावर प्रसार माध्यमाना आपली भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे. एकंदरीत असे अनेक आव्हाने प्रसारमाध्यमांपुढे असले तरीही लोकशाहीच्या निर्मितीसाठी प्रसार माध्यमांची भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भसूची:**

१. D.D.Basu, Introduction to the construction of India
२. M.Laxikanth, Indian polity, Tata Megraw Hill. Education pri.Ltd. Delhi
३. फाडिया एवं फाडिया, उच्चतर लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन, अग्रा, २००१
४. ग्रँव्हल आसटिन, अनुवाद, भरती केळकर, भारतीय राज्यघटना- राष्ट्राची कोणशीला, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१३
५. प्रा.के.बंग, भारतीय प्रशासन व सविधनात्मक प्रक्रिया, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद,२०१६
६. डॉ.पारस बोरा/ डॉ.शाम शिरसाठ, लोकप्रशासन शास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद,२०१३
७. डॉ.सुधाकर जोशी, भारतीय प्रशासन व राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद,
८. www.lokshahimarathiblogspot.Com
९. www.m.dailyhunt.in
१०. www.youstory.com
११. www.loksatta.com

**Associated & Indexed at:**

- Impact factor services for international journals (I.F.S.I.J.)
- International Innovative Journal Impact Factor
- Cite Factor (Academic Scientific Journals)
- Academic Resource Index (Research Bib)
- International scientific indexing (ISI)
- Scientific Indexing Services
- Global Impact Factor
- Infobase Index
- COSMOS
- DIIF

SCHOLARS IMPACT

INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

www.scholarsimpact.com

ISSN 2394 -7632
EISSN 2394 -7640

Deshmukh Publication Pvt.Ltd.

Printed & Published by
Dr. M. Talib Deshmukh & Edited by Dr. M. Raghib Deshmukh,
"Deshmukh Publication Pvt. Ltd." Beside Deshmukh Hospital,
Millat Colony, Khamgaon Dist. Buldana (Maharashtra) India – 444303
Email: scholarsimpact@yahoo.com, ragibdeshmukh@gmail.com,
Website: www.scholarsimpact.com
Cell No. : +91-9422926544 , +91-7972780976

# The English Educators Society, Ambajogai (MS)

**Organizes**

**One Day Interdisciplinary International conference on**

# The Relevance of Anna Bhau Sathe in the Global Context

**14th December, 2019**

# Certificate

This is to certify that Mr./Ms./Dr./Prof. Bhagwan Shankarrao Waghmare of Arts Commerce and Science College Ashti Dist. Beed has participated in One Day Interdisciplinary International conference on "*The Relevance of Anna Bhau Sathe in the Global Context*" organized by The English Educators Society, Ambajogai (MH) on 14th December, 2019 at Maulana Abul Kalm Azad, Research Center, Aurangabad. He / She has presented the research paper entitled साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे : जीवन, साहित्य व कार्य

**Ms. Anuprita More**
Organizing Secretary

**Dr. Dayaram Maske**
Coordinator

**Dr. Ramesh Landage**
Convener

ISBN : 978-81-939613-2-2



# अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यीक

संपादक
डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

ISBN : 978-81-939613-2-2

# अण्णा भाऊ साठे: समतावादी साहित्यीक

डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

Shaurya Publication, Latur

DECLARATION BY THE PUBLISHER

ISBN : 978-81-9396-2-2

संपादक

डॉ. दिपक सुर्यवंशी
डॉ. सदाशिव भुयारे
अनुप्रिता मोरे

**Publication**
Shaurya Publication
Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512
Email-hitechresearch11@gmail.com

**Printing**
Shaurya Offset, MIDC, Latur

**First Edtion-14th Dec. 2019**

**Note :-**Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

** All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **Dr. Deepak Surwanshi, Dr. Sadashiv Bhuyare, Anuprita More**





## दोन शब्द... :

लोकशाहीर, कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, संयुक्त महराष्ट्र निर्मीतीच्या लढयाचे लोकनायक, वैश्विक तत्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ, व साहित्य रत्न अशा नावांनी अण्णा भाऊ साठे हे जागतिक स्तरावर प्रख्यात आहेत. अण्णा हे अक्षर साहित्याचे उदगाते व विद्रोही मुल्यांचे सर्जक आहेत.त्यांची लेखनीं ही सत्याशी व मुल्याशी इमान राखनारी आहे.शोषण व अन्याय सहनकरीत घाम गाळणाऱ्या व कष्ट करणाऱ्या मानसांच्या डोळयातील आश्रुंची भाषा अण्णाना समजली होती.
विद्रोह, आक्रोश, बंड, चीड, जातियता, नकार, विरोध, उठाव व संताप यासारख्या समग्र परिवर्तनाच्या शासवत मुल्यांची त्यांनी पेरणी करून समाजाला दास्यमुक्ती व जीवनमुक्तीचा मार्ग दाखवित निर्भयपणाने वैचारीक बंड उभारले. अण्णांच्या साहित्यातून विषमतावादी साहित्यातील विद्रुपता आणि क्रुरतेचे दर्शन होते.अण्णाच्या सहित्यात समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्वावाचे मानवतावादी तत्वज्ञान आहे.स्त्रीत्वाचा आत्मसन्मान व प्रतिष्ठेचा आहे.विज्ञान धिष्ठतेचा आग्रह आहे.माणूसपण नाकारणाऱ्या अमानवीय व्यवस्थेविरूध्दचा यल्लगार आहे.हा देश, या देशाची जनता सुखी व्हावी व या देशाचे नंदनवण व्हावे अशी अण्णांची क्रांतीकारी स्वप्ने आहेत.माणूस हाच खऱ्या अर्थाने जगातील प्रत्येक क्रांतीचा उद्गाता असल्याचे अण्णांचे स्पष्ट मत होते.मरत मरत जगणारी माणसं ही खऱ्या अर्थाने जगतच नसतात तर या उलट लढून मरणारी मानसं ही मरूनही जिवंत रहातात हे मुख्य जिवनसुत्र अण्णांच्या साहित्यात आहे.विशेष म्हणजे अण्णाचे समग्र साहित्य निर्मीतीच्या गुणवत्तेचे मानदंड आहे.

विश्वसाहित्य रत्न आण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमीत्ताने त्यांना विनंम्र अभिवादन व या एकदिवशीय अंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजक प्रा.डॉ.रमेश लाडंगे यांचे हर्दिक अभिनंदन. या निमित्ताने प्रकाशित होणारे हे पुस्तक संशोधक विद्यार्थी तथा शैक्षणिककक्षेत्रात मैलाचा दगड ठरेल ही अपेक्षा...!

प्रा.डॉ. माधव बसवंते
नांदेड

ISBN : 978-81-939613-2-2

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मराठी कादंबरी आणि अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी वाङ्मय : एक अभ्यास<br>प्रा. डॉ.शरद गायकवाड | 9 |
| २. | अण्णा भाऊ साठे यांनी अनुभूती व सहानुभूतीतून कादंबरी लेखनासाठी निवडलेले वेगळे विषय.<br>डॉ. प्रमोद भीमराव गारोडे | 31 |
| ३. | अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक<br>डॉ. आश्रु जाधव | 41 |
| ४. | अण्णाभाऊ साठे यांचे तत्त्वज्ञान<br>प्रा.डॉ.आचार्य आर.डी. | 46 |
| ५. | अण्णाभाऊ साठे यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन<br>डॉ. आंबटकर वृषाली ओंकार | 49 |
| ६. | अण्णा भाऊंचे आर्थिक विचार<br>महेश वसंत कुलकर्णी | 54 |
| ७. | अण्णाभाऊ साठे यांचे कथा साहित्य<br>प्रा.डॉ. अर्चना काटकर - सोनवणे | 58 |
| ८. | **अण्णा भाऊ साठे : साहित्य व स्वरूप**<br>प्रा.आशालता नारायण खोत | 62 |
| ९. | अण्णाभाऊ साठे : एक मार्क्सवदी तत्वज्ञ.<br>डॉ.प्रा.लोखंडे वी.बी. | 68 |
| १०. | **अण्णाभाऊ साठे यांच्या भाषणातील साहित्याबद्दलचा मूलगामी दृष्टिकोन**<br>डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 73 |
| ११. | 'वारणेच्या खोऱ्यात' कादंबरीतील देशप्रेम व विद्रोही जाणिवा<br>बेटकर वैशाली चनबस | 79 |
| १२. | अण्णाभाऊ साठे : जीवन, साहित्य आणि कार्य<br>प्रा. डॉ. भोवाळ दयानंद लिंबाजी | 84 |
| १३. | लोक शाहिर अण्णाभाऊ साठे साहित्य, कार्य आणि मातंग समाज<br>डॉ. प्रमोद चव्हाण | 92 |
| १४. | अण्णा भाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक<br>प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 94 |
| १५. | **आण्णाभाऊ साठे यांचा महिलांकडे पहाण्याचा दृष्टीकोन**<br>प्रा.डॉ. दैवशाला चत्रभुज रसाळ | 99 |
| १६. | साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या चिंतनातील मानवतावादी दृष्टीकोन<br>प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 106 |
| १७. | सांख्य तत्वज्ञान (सत्ताशास्त्रीय दृष्टीकोन)<br>डॉ. आंबटकर वृषाली ओंकार | 113 |
| १८. | अण्णाभाऊ साठे यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन<br>डॉ. आंबटकर वृषाली ओंकार | 117 |
| १९. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि कार्य<br>डॉ. भगवान शंकरराव वाघमारे | 121 |
| २०. | आण्णाभाऊ साठे साहित्य जीवन आणि कार्य<br>प्रा.डॉ.तांदळे एस.के. | 126 |
| २१. | अण्णाभाऊ साठे यांना अपेक्षित असलेली स्वातंत्र्याची संकल्पना<br>प्रा. डॉ. शंकर गड्डमवार | 132 |
| २२. | अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्र व कार्य<br>हरिचंद्र विष्णू केळे | 138 |
| २३. | आण्णाभाऊ साठे – एक व्यक्तीमत्व<br>प्रा.डॉ.सीता दत्तात्रय जगताप | 144 |
| २४. | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे<br>प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे | 148 |
| २५. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथालेखनातील विद्रोह<br>प्रा.डॉ.ल.ना.वाघमारे | 156 |
| २६. | 'चित्रा' कादंबरीतील स्त्रीदर्शन<br>प्रा. डॉ. माने हनुमंत तुकाराम | 160 |
| २७. | अण्णा भाऊ साठे : जीवन साहित्य आणि कार्य<br>डॉ. माणिक एम. बागले | 164 |




ISBN : 978-81-939613-2-2

त्यांना झाली म्हणून त्यांनी आपल्या साहित्य लेखकाना वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आग्रह धरुन तसेच विचार मांडले.

**सारांश :**

विज्ञान हे एक मुल्य आहे तो एक दुष्टीकोन आहे. ज्याचे मुल्या ज्यांनी जाणलेली तो सर्व तऱ्हे समस्येतून तरला हे सत्य आहे. आजारी भारतासारख्या निकषातून राष्ट्रात अंधश्रध्देने आपली मुळ सोडली नाहीत विज्ञान युगात जगत आहोत, असे म्हणणारे देखील वैज्ञानिक दृष्टीकोनातून स्विकारुत नाहीत म्हणून उच्चशिक्षीत म्हणारे देखील मुहुर्तदेव यज्ञ, याग, रुढी परंपराच्या जखडातून बाहेर आले नाहीत. आजही अनेक मुलीचे विवाह हे तिला मंगळ आहे अस मानूण होत नाहीत असे विचार आज ही समाजात आहेत. आज ही भारतासारख्या राष्ट्रात 75% लोक हे अंधश्रध्देच्या अडकून पडले आहेत. वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारुन समस्यांची चिकितसकता नैतिकता ओ याची जाणीव होणे गरजेचे आहे असे जोपर्यंत होत नाही तो पर्यंत कोणताच समाज परीपूर्ण विकास करु शकत नाही. हे अण्णाभाऊ साठे यांचे विचार महत्वाचे आहेत. जोपर्यंत वैज्ञानिक दृष्टीची जाणीव होत नाही तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर , म. फुले , अण्णाभाउ साठे, यांच्या विचारांना आणि प्रयत्नांना पूर्णपणे यश येणे शक्य नाही. हे साम्य आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारुन समस्यांची उकल करणे दि. विज्ञानाची आणि मानवजातीची हाक आहे.

**संदर्भ :-**


6 अण्णाभाऊ साठे , लोक आवृत्ती फकीरा श्रमीक प्रतिष्ठाण, कोल्हापूर.

7 परिवर्तन संपादक : प्रा. शिवाजी जावळेकर

8 प्रा. डॉ. आर.डी. साबळे , भारतातील थोर राजकीय तत्वचिंतक प्रभावृत्ती 2 ऑक्टोर 2010 इसाप प्रकाशन.

9 डॉ. एस.एस. गाढाळ, महाराष्ट्रातील समाज सुधारक विचारधारा व कार्य कैलास पब्लिकेशन

10 बाबुराव गुरव, अण्णाभाऊ साठे, लोकवाड्मय गृह






# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि कार्य

डॉ. भगवान शंकरराव वाघमारे,
लोकप्रशासन विभाग प्रमुख,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी , ता. आष्टी जि.बीड.

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्याचा महामेरु म्हणून साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्याकडे संपूर्ण जग पाहते. कोणत्याही प्रकारचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक साहित्याचे वलय नसताना देखील मराठी मनावर अण्णा भाऊ साठे यांनी अधिराज्य गाजवले व मराठी साहित्याची व्याख्याच बदलून टाकली. परंपरागत व अभिजातवादी साहित्यापेक्षा वास्तववादी साहित्याची मांडणी करुन मानवी जीवनाचा वेध घेणाऱ्या साहीत्याची निर्मिती अण्णाभाऊ साठे यांनी केली. त्यांच्या साहित्यातील प्रत्येक पात्र व व्यक्तीरेखा समाजव्यवस्थेचे वास्तव प्रतिबिंब दर्शवितात म्हणूनच उच्च व मध्यमवर्गीया बरोबर महाराष्ट्रातील दलित, शोषित व पिडीत वर्गांना अण्णाभाऊ चे साहित्य अधिक आकर्षित करते. समाजव्यवस्थेच्या विविध अंधश्रध्दा, प्रथा-परंपरांना येथील गरीब व कष्टकरी समाज कसा बळी पडतो व त्यात तो अधिक भरडला जावून त्याची पिळवणूक कशी होते. त्यासंबंधीची प्रखर मांडणी अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून केली आहे.

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाजातील विविध समस्येवर प्रहार करत असे. महाराष्ट्रातील काळाच्या ओघात उद्भवणाऱ्या समस्या व प्रश्नावर निर्भिडपणे मत मांडत असत. समाजाला योग्य दिशा देण्याचे काम आयुष्यभर त्यांनी केले होते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मराठी वाङ:मयाला अधिक समृध्द केले आहे हे साहित्यातील कोणताही जाणकार साहित्यीक नाकारू शकत नाही. तेव्हा अण्णा भाऊच्या संघर्षमय जीवनाचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य व कार्ये :**

तुकाराम भाऊराव उर्फ शिवशाहीर अणा भाऊ साठे यांचा जन्म 01 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्हयात वाळवा तालुक्यात वाटेगाव या लहान गावात झाला. अण्णा भाऊ साठे हे महाराष्ट्राला एक शाहीर म्हणून परीचित असले तरी कथा व कादंबरी हे साहित्य प्रकार हि त्यांना ताकतीने हाताळले आहेत. पूर्णपणे निरक्षर व अशिक्षित असणारे अण्णाभाऊ कथा, कादंबऱ्या, लोकनाटय, पोवाडे, लावण्या, वग, गवळण, प्रवासवर्णन अशा सर्वच क्षेत्राला समृध्द केले आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळचळ व गोवामुक्ती संग्राम या चळचळीमध्ये सक्रिय सहभाग घेवून शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधन करीत होते. शाहिरीच्या माध्यमातून क्रांतीची व संघर्षाची ज्वाला पेटवत असत. मुंबई हे शहर महाराष्ट्राचे व येथीज जनतेचे क्रेंद्रबिंदू आहे. येथे राहणाऱ्या मराठी लोकांची संख्या तुलनेने अधिक आहे. तसेच मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असून त्यावर फ क्त मराठी भाषिकांचा हक्क प्राप्त होतो. त्यामुळे मुंबई सह संयुक्त

महाराष्ट्राची निर्मिती झाली पाहीजे अशी तळमळ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची होती. त्यासाठी त्यांनी समाज प्रबोधनाचे काम अधिक प्रमाणात केले. 'महाराष्ट्राची परंपरा' हा त्यांचा पोवाडा म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्याचा ज्वलंत इतिहास आहे. अण्णा भाऊ साठे यांनी मराठीतील शाहीरी कला प्रकाराला वैभव प्राप्त करून दिले. शाहीर अण्णाभाऊ साठे, द.ना. गव्हानकर आणि अमर शेख या तीन शाहीरांची महाराष्ट्राच्या शाहीरी इतिहासात सुवर्ण अक्षराने नावे लिहिली गेली असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही.

लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांची कामगाराबद्दल अत्यंत निष्ठा व तळमळ होती येथील कामगार एकसंघ होवून आपल्या न्याय हक्कासाठी लढला पाहिजे म्हणून त्यांनी अनेक प्रयत्न केले. 'जगातल्या कामगारांनो, एक व्हा ' या कार्लमार्क्सच्या विचारांचा प्रभाव अण्णाभाऊवर अधिक पडला. वर्ग संघर्ष टाळून स्वतःला चळवळीमध्ये झोकून दिले पाहिजे व एकीने भांडवलशाही व्यवस्था उधळून लावली पाहिजे. यासाठी ते प्रयत्न करत होते 'मुंबईतील गिरणी कामगार' हा पोवाडा गिरणी कामगारांचा प्रेरणास्त्रोत होता. मुंबईतील गिरणी कामगारांच्या हक्कासाठी लढत होते. कामगारांनी आपल्या कामावर निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. असे ते कामगारांच्या मनावर बिंबवत असे. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलित शोषित कामगारांच्या तळहातावर तरली आहे'.असे विचार मांडून पौराणिक व परंपरागत विचारांना झूगारून दिले होते. कामगारांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे व श्रमाची प्रतिष्ठा मिळाली पाहिजे याचा अण्णा भाऊ पुरस्कार करत होते. ते साम्यवादी विचाराने प्रभावित झाले होते. अण्णा भाऊ साठे यांना रशियामध्ये जाण्याची संधी मिळाली तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा रशियामध्ये गायीले. त्याचे पूढे रशियन भाषेमध्ये अनुवाद करण्यात आले. कामगारांच्या हक्कासाठी लढणारा प्रत्येक नेता हा अण्णा भाऊंच्या शाहीरीचा जणू नायक होता. खाणदेशातल्या श्रीपत पाटलांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या कामगारांच्या मोर्चात नऊ कामगारांनी प्राण गमावले. श्रीपत पाटलांनी हौतात्म पत्कारले. त्यांच्यावर अण्णाभाऊ साठे यांनी 'अंमळनेरचे अमर हुतात्मे ' हा पोवाडा लिहिला. तो गायला आणि त्यातून श्रीपत पाटिल यांना अमरपद दिले.

'श्रीपत पाटील दिलदार | पुढारी खंबीर | केला निर्धार|
घेऊन विचार सर्वांचा | बेत केला त्याने निकराचा |'

अण्णाभाऊच्या लिखाणातून वाचकांना कायम स्फुर्ती मिळते. इंग्रज सरकारच्या काळात पश्चिम बंगालमध्ये आलेल्या दुष्काळात हजारो लोक मरण पावले त्याचे इंग्रज सरकारला काहीच वाटले नाही. त्यावेळी अण्णा भाऊ साठे यांनी 'बंगालची हाक' हा पोवाडा लिहून भारतातील युवकांना एकजूटीने लढण्याचे आवाहन करतात.

अण्णाभाऊ साठे यांची लेखनी ही शोषितांचा बुलंद आवाज होती. सामान्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूध्द बंड करण्यासाठी प्रेरीत होवून उठणारी होती. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर कार्लमार्क्सच्या तत्वज्ञानाचा प्रभाव होता त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा ही





फार मोठा प्रभाव होता. घाव घालून जग बदलण्याचे तत्वज्ञान या महामानवांकडून त्यांनी घेतले होते. समाजातील धनदांडगे, जातीयवादी व धर्ममार्तंडाकडून जे शोषण दलितांचे केले जात होते. त्यावर ते दलितांच्या बाजूने ठामपणे उभे राहून लढत होते. ही शोषित व्यवस्था बदलण्याचे व घाव घालण्याचे काम अण्णाभाऊ करत होते.

जग बदल घालुनी घाव | सांगून गेले मला भीमराव |

दलित वर्गाचे दुःख अण्णा भाऊनी भोगले होते. त्यामुळे दलितावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द त्यांचा लेखणप्रवास आयुष्यभर चालू होता. अण्णाभाऊनी 'फकिरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब यांच्या लेखणीस अर्पण केली आहे. या कादंबरीस वि.स.खांडेकरांनी प्रस्तावना लिहिली असून या कादंबरीतून अन्यायाविरूध्द बंड करून उठणाऱ्या लढवय्या फकिराची कहाणी आहे. ही कादंबरी मराठी साहित्यात आपली वेगळी छाप सोडली असून त्यावर पूढे मराठी चित्रपट देखील तयार झाले आहेत. यासह अन्य सहा कादंबऱ्यावरही चित्रपट तयार झाले आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील व्यक्तीचित्रे अप्रतिम आहेत. विशेषतः राणोजी मांग, शंकरराव पाटील, विष्णूपंत कुलकर्णी व रावसाहेब खोत यांची व्यक्तिमत्वे वाचकास आवड निर्माण करतात.

अण्णा भाऊ साठेनी काव्य या वाङःमय प्रकारात पोवाडा, लावणी, गोळण, गण, कटाव, निसर्गगीतं, स्फूर्तीगीतं, शेतकरी गीतं, प्रहार /घावगीतं, व्यथा - शल्यगीतं, भावगीतं, व्यक्तिगत गीतं, कामगार गीतं असे असंख्य प्रकार हाताळले. त्यातून त्यांनी अन्याय, अत्याचार, हिंसाचार यांचा धिक्कार करत असे. पंजाब - दिल्ली दंगा, नानकिंग नगरापूढे, स्टॉलिनग्राडचा संग्राम, काळ्या बाजाराचा पोवाडा अशी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाची पोवाडे निर्माण करून समाजाचे वास्तव चित्रण मांडले आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी वीर रसाबरोबर श्रृंगार रसातही मोठे लिखाण केले आहेत. अनेक लावण्या व तमाशाच्या माध्यमातून स्त्री प्रधान साहित्य निर्माण केले व समाज वास्तव मांडले आहेत. त्यांच्या अनेक लावण्यांमधील समाजमनावर आजही अधिराज्य गाजवणारी लावणी म्हणजे 'माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली' ही आहे. लोकनाटय पूढे नेण्यासाठी 'कटाव' काव्यप्रकार असतो. तो अण्णाभाऊनी विषयानुरुप मार्मिकतेनं मांडतात. तसेच तमाशा हा कला प्रकारही अण्णा भाऊनी उत्तमपणे हाताळला आहे. ज्यात स्त्रीच्या वर्णनाबरोबरच सामान्य माणूस, कामगार, महापुरुष व राष्ट्र यांना नमन करतात. या लोकनाट्यातील स्त्री शेतकऱ्यांची बायको असते व तिची कथा व व्यथा मांडली जाते. अणा भाऊ साठे यांनी अनेक लोकनाटयांची निर्मिती केली आहे. लोकमंत्र्याचा दौरा, बिलंदर बुडवे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, देशभक्त घोटाळे, शेटजीचे इलेक्शन, पॅग्यांच लगीन, मुक मिरवणूक, खापऱ्या चोर, माझी मुंबई अशा लोकनाट्यामधून अण्णा भाऊ समाज प्रबोधन व समाज जागृती केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'लाल बावटा ' या कलापथकानं इथल्या शासनकर्त्यांना कला पथकाच्या लोकनाट्यातून जेरीस आणल होत.

अण्णाभाऊ साठे यांनी अनेक दमदार कथा लिहिल्या आहेत. बरबाद्या, कंजारी, खुळंवाडी, चिरागनगरची भूतं, कृष्णाकाठच्या कथा आदी एकोणिस कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. भोमक्या, स्मशानातील सोनं, विठ्ठू महार, मरीआईचा गाडा, सापळा, वळण व उपकाराची फेड या त्यांच्या कथामधून समाजातील विषमता व सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्रण मांडतात. जी सर्वसामान्य माणसाला चिड निर्माण करणारी असते. स्त्रीच्या व्यथा मांडणाऱ्या अनेक कथांची निर्मिती अण्णाभाऊनी केली आहे. चंदा, दुर्गा, अटकळ, डोळे, खेळखंडोबा, माहेरची वाट, जिव्हाळा, लीन भाकरी, तरस, गुरहाळ आदी कथा समाजमनात त्या आजही घर करुन बसल्या असून वाचकाला हीनतेची चीड निर्माण करणाऱ्या आहेत. स्त्रीयांना कोणकोणत्या अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागते याचे वास्तव चित्रण त्यातून मांडले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी स्त्री नायकत्वाला महत्व देवून अनेक कादंबऱ्यांची निर्मिती केली आहे. चित्रा, आवडी, माकडीचा माळ, कुरुप, डोळे मोडीत राधा चाले, तारा, मुर्ती, वैजयंता, फूलपाखरु, चंदन, संघर्ष, आग आदी कादंबऱ्यांमधून स्त्रीची विविध रुपे रेखाटली आहेत. तसेच शिवाजी महाराजाचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या जीवनावर आधारित 'अग्निदिव्य' ही ऐतिहासिक कादंबरी आण्णभाऊनी लिहिली आहे. त्यामुळे मराठी साहित्यात अण्णाभाऊच्या साहित्य व कार्येकृतींना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. तसेच 'माझा रशियाचा प्रवास' हा प्रवासवर्णन आण्णाभाऊंनी लिहिला असून त्यात रशिया व भारत या दोन देशातील सामाजिक व आर्थिक स्थितीची तुलनात्मक मांडणी केली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी समतावादी विचारांचा स्वीकार केला होता. तसेच पूढे मुंबईत श्रीपाद डांगे यांच्या सहवासात आले व मार्क्सवादाबाबतची जाणीव अधिक घटट् झाली. मुंबईच्या झोपडीत राहणाऱ्या मानसाचे जीवन चित्रण वेळोवेळी आपल्या साहित्यामधून मांडले आहेत. अण्णभाऊ यांचे साहित्य अनेक भारतीय भाषामधून अनुवादीत झाले आहे. एवढेच नाही तर झेक,जमर्न,इंग्लिश,पोलिश,रशियन व स्लोव्हाक या परकीय भाषेमध्ये अनुवादीत झाले आहे त्यामुळे अण्णा भाऊ साठे हे जागतिक किर्तीचे साहित्यीक म्हणून नावारुपाला आले आहेत.

**निष्कर्ष :-**

अण्णाभाऊ साठे हे एक थोर मानवतावादी साहित्यीक होते . जातीयता, सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, कुप्रथा व परंपरा यांचे समुळ उच्चाटन झाले पाहिजे व समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे याचा पुरस्कार करुन साहित्याची निर्मिती अण्णाभाऊंनी केली आहे. तसेच वर्ग विरहीत समाजाची निर्मित करुन शोषित पिडीत यांच्या हक्कासाठी अण्णाभाऊनी आयुष्यभर लढा दिला आहे. संघर्षाशिवाय परिवर्तन होवू शकत नाही अण्णाभाऊची धारणा होती. त्यांनी आपल्या साहित्यातून विविध पातळ्यावरचा संघर्ष मांडला आहे. अण्णाभाऊ साठे हे फक्त साहित्यीकच नव्हते तर उत्तम पत्रकार, समिक्षक, गायक, वादक, उत्तम नट व अव्दितीय शाहिर होते. एवढेच नव्हे ते थोर समाज सुधारक व प्रबोधनकार होते. समाजाला दिशा देणारे दिशा दर्शक व मार्गदर्शक होते. त्यांनी विविध चळवळी मध्ये उल्लेखनीय काम केले असुन 1949 मध्ये 'इप्टा'च अध्यक्षपद ही भूषविले आहेत.





अण्णाभाऊ चे जीवन, साहित्य, प्रवास व कार्ये तरुणपिढीला निरंतर प्रेरणास्त्रोत असणार आहे यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ सूची:**

1) 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, निवडक वाङ मय (कादंबरी खंड-1 व 2)', साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती 1 मे 2017.
2) डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, जनवादी साहित्यिक अण्णाभाऊ साठे (संपादित), डायमंड, पब्लिकेशन, पुणे.
3) प्रा. विजयकुमार जोरणे, अण्णाभाऊ साठे चरित्र्य व कार्ये.
4) श्री इंगळे अर्जून, अण्णाभाऊ साठे.
5) www.bookganga.com
6) https://maharashtratimes - indiatimes.com
7) www.e sakal.com
8) www.booksnama.com

केल्यानें होत आहे रे । आधीं केलेचीं पाहिजे ।।

भारतीय-शिक्षण-प्रसारक-संस्था-अम्बाजोगाईनगरी

## स्वातन्त्र्यवीरसावरकर-महाविद्यालयः बीड (चम्पावतीनगरम्)

## ।। संस्कृत विभाग ।।

डॉ.बाबासाहेब-आम्बेडकर-मराठवाडा-विश्वविद्यालयः औरङ्गाबाद इत्यनयोः

संयुक्ताश्रयेन आयोजिता

# राष्ट्रीय-संस्कृत-परिषद्

संस्कृत-मराठी-ऋणानुबन्धः

आङ्ग्ल दिनाङ्कः १४ मार्च २०२०

# प्रमाणपत्रम्

सानन्द प्रमाणीक्रियते यत् श्रीमान्/श्रीमती डॉ. वाघमारे भगवान शंकर

महाविद्यालयः कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी महोदयेन/महोदयया स्वा.सावरकर-महाविद्यालये

आयोजितायां संस्कृतपरिषदि २०२० ख्रिस्ताब्दे मार्चमासस्य १४ दिनाङ्के: सोत्साहं सहभागं स्वीकृतम्

.................................................... विषयम् अनुसृत्य/शोधनिबन्धः प्रस्तुतः/मार्गदर्शनम् कृतम् ।

भवतः/भवत्याः वर्धमानकर्तृत्वं भारतमातुः चरणे समर्पितं भवेत् इति ।

प्रा.सचिनः कंदले

डॉ.संजय शिरोडकरः

ISSN: 2454 - 7905

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

website: WWW.WIIDRJ.com

**Vol. I** **Special ISSUE - XXIII** **Year – 6** **14 March 2020**

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई.

## स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

**Special Issue for Sanskrit**

# One Day National Level Interdisciplinary Conference

## (एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद)

# संस्कृत - मराठी ऋणानुबंध

**संपादक**

**प्रा. सचिन कंदले**
आयोजक व संस्कृत विभाग प्रमुख

**डॉ. संजय शिरोडकर**
प्राचार्य व संयोजक
स्वा. सावरकर महाविद्यालय. बीड.

**सह संपादक**

प्रा. डॉ. सोपान सुरवसे
प्रा. डॉ. रमेश गटकळ
प्रा. आनंद रत्नपारखे
प्रा. अशोक रुपनोर

**Bhartiy Shikshan Parasarak Sanstha**
**Kholeswar Madhyamic Vidyalaya, Ganesh Nagar, Kuttar Vihir Ambejogai.**
**Email: bsps2011@rediffmail.com**

**::Address for Correspondence::**
**Mrs. Pallavi Laxman Shete**
Editor in Chief: Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred)
Principal, Sanskrti Public School, Nanded (MH. India)
**Email: Shrishprakashan2009@gmil.com Website: WWW.WIIDRJ.com**
**Dr. Rajesh G. Umbarkar**
House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605(India –Maharashtra)
**Email:**umbarkar.rajesh@yahoo.com Shrishprakashan2009@gmil.com **Mob. No:** 9623979067
<u>**Director**</u> **: Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

# Worldwide International Inter Disciplinary Research

## (A Peer Reviewed)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |

***Printed by***
Anupam Printers, Nanded.

**Cost: Rs. 300/-**

**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | IMPORTANCE OF YOGA IN STRESS MANAGEMENT | Dr.Rama Pande | 01 |
| 02. | PRACTICES OF AIR SANITAITON IN SANKRIT LITERATURE OF AYURVEDA | Krishna V. Bartakke | 05 |
| 03. | IMPACT OF SANSKRIT ON INDIAN ENGLISH NOVELS WITH SPECIAL REFERENCE TO MUSIC | Laxmikant Bahegavankar | 08 |
| 04. | IMPACT OF SANSKRIT AND DIGITAL LIBRARIES ON HIGHER EDUCATION | Mr.Thorat Uttam Dagduji | 12 |
| 05. | ASHOKA PLANT IN SANSKRIT LITERATURE | Deepa R. Deshpande Shimply N. Joshi<br>Akash S. Gavate<br>Dr.Rupali B. Kulkarni | 16 |
| 06. | A STUDY OF NATYASHASTRA AND IMPACT ON WORLD LITERATURE | DR. Mahananda C. Dalvi | 20 |
| 07. | WATER PURIFICAITON PROCESSES IN ANCIENT SANSKRIT LITERATURE | Krishna V. Bartakke | 24 |
| 08. | INFLUENCE OF SANSKRIT ON PRAKRIT GRAMMAR | Prajakta Dharmarao | 27 |
| 09. | SCIENCE IN SANSKRIT | Prof. Pathak Suraj Jivanrao | 31 |
| 10. | THE BRAVE AND EXTRAORDINARY SANSKRIT SCHOLARPANDITARAMABAISARASWATI | Deshpande Monica Madhukar | 35 |
| 11. | CRITICAL ANALYSIS OF MOTIVATION AND ADJUSTMENT AS PSYCHOLOGICAL CONCEPTS IN BHAGAVAD GITA | Mr. Toshnival Mahesh Dwarkadas | 38 |
| 12. | CHEMICAL SCIENCE & SCIENTIFIC ELEMENTS IN SANSKRIT & VEDAS | Dr. Umakant Chanshetti | 42 |
| 13. | REVIEW ON : USE OF SANSKRIT FOR NATURAL LANGUAGE PROCESSING | Choudhari Bhargavram Yogeshwar<br>Kale Sanjay Ramchandra | 46 |
| 14. | Śivayogapradīpikā: an unknown Sanskrit yoga text. | Julia Gabriela Walker | 51 |
| 15. | Nyāya in Sanskuta | Dhanashree Shejwalkar | 59 |
| 16. | CONSPICUOUS VENEER BETWEEN ENGLISH AND SANSKRIT: A REVIEW | Dr. Sangeeta S. Sasane | 66 |
| 17. | A STUDY OF LONELINESS AND SELF CONCEPT AMONG BOYS AND GIRLS COLLEGE STUDENTS | Dr. Daitkar Arun Rajaram | 70 |
| 18. | BHARATA MUNI'S NATYA-SHASTRA- THE SOUL OF INDIAN THEATRE | Dr. Deshpande Madhuri Madhukar | 75 |
| 19. | BIODIVERSITY AS REFLECTED IN VEDAS | Rupali Raghunath Wadekar | 80 |
| 20. | CONTRIBUTION OF KALIDASA IN ENGLISH LITERATURE | Dr. Korde Rajabhau Chhaganrao | 85 |
| 21. | Concept of 'Liquid and it's properties' in *Vaiśeṣika Darṣana* | Manisha Puranik | 90 |
| 22. | IMPORTANCE OF YOGA: A REVIEW | Mr. Lahoti Ramesh Kachrulal | 95 |
| 23. | KAUTILYA'S THOUGHTS ON TRADE SYSTEM IN KAUTILIYAM ARTHASHASTRAM | Ms. Pratibha B. Dhondkar | 98 |
| 24. | SIR MONIER WILLIAM AND *SHAKUNTALAM* | Dr. S. S. Sasane | 102 |

| | | | |
|---|---|---|---|
| 25. | KAUTILYA'S ARTHASHASTRA | Dr. Rajesh G. Umbarkar | 104 |
| 26. | THE DEVELOPMENT OF AGRICULTURAL SCIENCE IN ANCIENT SANSKRIT LITERATURE | Dr. Minal N. Shrigiriwar Dr.Sow.Indirabai Bhaskarrao Pathak | 113 |
| 27. | TYPES OF TRANSLATION | Asst. Prof. Magar S. R. | 117 |
| 28. | IMPORTANCE'S OF YOGA IN EFFECTIVE LIFE | Dr. Bendsure V.V. | 121 |
| 29. | AN ANALYSIS OF GENERAL LAND USE PATTERN IN BEED DISTRICT OF MAHARASHTRA | Dr. Udhav E. Chavan | 127 |
| 30. | बखर वाङमयातील संस्कृत शब्दकळा - पानिपतची बखर | प्रोफेसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 133 |
| 31. | संस्कृत सुभाषितांचा व्यक्तित्वावरील प्रभाव | प्रा. अभय सखाराम पाटील | 135 |
| 32. | संत साहित्य व संस्कृत भाषा | सौ. सत्यशीला तौर-देशमुख | 137 |
| 33. | मराठी रंगभूमी व संगीत नाटके | प्रा. डॉ. रमेश तु. देशमुख | 142 |
| 34. | मराठी तत्सम, तद्‌भव शब्दांवर संस्कृतचा प्रभाव | गितीका गणेश कुलकर्णी | 145 |
| 35. | संस्कृत भाषेतील वाक्प्रचारांचा मराठी भाषेत वापर | प्रा. घाडगे शंकर धारबा | 147 |
| 36. | यज्ञ पध्दतीचा पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. कविता दुर्गादासराव तिर्थे | 149 |
| 37. | लिंगायत-वीरशैव धर्मसंप्रदाय आणि संस्कृतः एक अनुबंध | गादगे एल.एस. | 152 |
| 38. | अर्थशास्त्राचा निर्माणकर्ता : कौटिलय | प्रा. डॉ. देविदास नागरगोजे प्रा. डॉ. साबळे ई. जी. | 155 |
| 39. | अभिनयाचे प्रकार : रंगभूमीवरील बदलते प्रवाह, एक दिग्दर्शकीय दृष्टिकोन | माया भगवान बोर्डे | 158 |
| 40. | वैदिक संस्कृत व पर्यावरण | डॉ. अपर्णा जिरवणकर | 162 |
| 41. | संस्कृत भाषेच्या शब्द, म्हणी, वाक्प्रचारांचा मराठी भाषेत वापर | प्रा. डॉ. मनीषा वि. तांदळे | 167 |
| 42. | सांख्ययोग स्पष्टीकरणार्थ ज्ञानेश्वरीतील दृष्टान्त | पूजा नंदकिशोर मिसाळ | 169 |
| 43. | संस्कृत साहित्य की महिमा | प्रा.सत्येंद्र संगापा राऊत | 173 |
| 44. | संस्कृत में कथा साहित्य | श्रीमती दिपमाला सोमनाथ खडके | 175 |
| 45. | संस्कृत मे शास्त्रीय वाङ्मय | सौ. योजनगंधा जोशी | 177 |
| 46. | रूद्रदामनस्य शिलालेखः | प्रा. डॉ. श्रीमती कुरूडे सुनिता शंकरराव | 180 |
| 47. | चरित्र निर्माण कार्यासाठी भाषेची गरज | संतोष बाबुदेव जोशी प्रा. आनंद रत्नपारखे | 184 |
| 48. | भगवद्‌गीता व ज्ञानेश्वरी यांच्यातील पुरूषोत्तम योग | रामचंद्र आबा शिंदे | 186 |
| 49. | संस्कृत भाषेच्या म्हणींचा मराठी भाषेत वापर | सीमा सिद्धेश्वरराव चोबे | 189 |
| 50. | संस्कृत व मराठीतील समासांचा तुलनात्मक विचार | विशाखा अशोकराव जोशी | 192 |
| 51. | भारतीय भाषेत पाली भाषेचे स्वरूप व महत्व | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 196 |
| 52. | पंचविध यम आणि मानवी जीवन | प्रा. अरुण माधवराव चव्हाण | 200 |
| 53. | मराठी कीर्तन परंपरेवर संस्कृत वाङ्मयाचा प्रभाव | प्रा. डॉ. श्याम श्रीनिवासराव नेरकर | 203 |
| 54. | संस्कृत भाषेचा विज्ञानावरील प्रभाव | सौ. सुवर्णा बोरकर | 207 |
| 55. | भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचा मराठी नाटकावर प्रभाव | डॉ.राखी सिद्राम सलगर | 210 |
| 56. | मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संस्कृत अनुबंध | डॉ. क्रान्ती व्यवहारे | 213 |
| 57. | मराठी भाषेचे स्वतंत्र व्याकरण | प्रा.डॉ.हरिश्चंद्र मधुकर गायकवाड | 216 |
| 58. | संस्कृत एवं हिंदी का संबंध | डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर | 218 |

| | | | |
|---|---|---|---|
| 59. | अथर्ववेदातील पर्यावरण विचार | पुजा नागेश जोशी | 220 |
| 60. | योग - मानसशास्त्र विमर्श | प्रा. अ. रा. □वार | 223 |
| 61. | हस्तलिखिताचे कालनिर्धारण | श्री. निलेश बाबासाहेब शिंदे | 227 |
| 62. | वैज्ञानिक दृष्टिक्षेपातून भाषा संरचना | डॉ.अजित अशोक देव | 231 |
| 63. | संस्कृतमधून मराठीत आलेले शब्द | प्रा. डॉ. रमेश खिळदकर | 234 |
| 64. | *भारतीय जलशास्त्र* | श्रुति दत्तात्रय देवळे | 237 |
| 65. | संस्कृत आणि मराठी भाषांमधील विसर्गस्वरूप | डॉ. पल्लवी विजय कर्वे | 243 |
| 66. | योगाङ्गयमस्य मानवजीवनोन्नायकत्वम् | सम्भाजि विठ्ठल पाटील | 250 |
| 67. | पंचतंत्र व बृहत्कल्पसूत्रभाष्यातील अहि - नकुल कथेचे तौलनिक अध्ययन | मेघा मनोहर कढे | 255 |
| 68. | संचित धन | सीमा राजेश वीर | 260 |
| 69. | भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचे आकलन आणि मराठी नाटकाशी अनुबंध | प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी | 264 |
| 70. | मराठी सरस्वतांना मोहित करणारे: मेघदूत | प्रा.रा.ज.चाटे | 266 |
| 71. | रामराज्य आणिभारतीयलोकशाही राज्यपद्धतीची प्रासंगिकता | श्री. आघाव श्रीधर सोनराव | 268 |
| 72. | मराठी भाषेची जननी : संस्कृत - प्राकृत की पाली ? | प्रा. गौतम गायकवाड | 273 |
| 73. | प्राचीन ते अर्वाचीन संस्कृत भाषेचा प्रवास | करपे गुरबसप्पा निलकंठ | 277 |
| 74. | मराठी आख्यानकाव्य व संस्कृत आख्यानकाव्य : साहित्यानुबंध | प्रा. डॉ. अनिल गर्जे | 280 |
| 75. | मराठी तत्सम, तद्भव शब्दांवर संस्कृतचा प्रभाव | गितीका गणेश कुलकर्णी | 284 |
| 76. | नाट्यशास्त्रातील दशरूपक विचार | अदिती कमलाकर पंडीत | 286 |
| 77. | संस्कृतातील ज्योतिषविज्ञान | अंकिता राकेशकुमार जोशी | 289 |
| 78. | मराठी कीर्तन परंपरेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव | सौ. अश्विनी जगताप | 291 |
| 79. | आचार्य वराहमिहिर यांचे कृषिविषयक विचार | कु. शिंदोरे ऋचा रवींद्र | 294 |
| 80. | यज्ञ और पर्यावरण | डॉ. सोनवणे राजेंद्र | 297 |
| 81. | प्राचीन कालीन समाजातील स्त्रियांचे स्थान | ओव्हाळ सुमितकुमार सुदाम | 299 |
| 82. | यज्ञ आणि पर्यावरण | डॉ.प्रकाश लक्ष्मणराव डोम्पले | 303 |
| 83. | मराठी कीर्तन परंपरेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव | श्री. प्रतीक देशमुख | 308 |
| 84. | संस्कृत-मराठी ऋणानुबंध | सौ.स्नेहल दर्शन देशपांडे | 313 |
| 85. | स्मृत्युक्त मनोविज्ञानांशः | प्रणव दर्शनानंद चौसाळकर | 316 |
| 86. | संस्कृतन्यायानां मराठीलोकोक्तिनां च सम्बन्धः। | विनय व्यंकट गायकवाड | 318 |
| 87. | प्राचीन संस्कृत वाङ्मयातील 'जल' संकल्पना व 'जलविज्ञान'. | पियुषा पुरुषोत्तम नाईक | 321 |
| 88. | योग विज्ञान आणि मानवी जीवन | प्रा. डॉ. सोपान सुरवसे<br>प्रा. डॉ. रमेश गटकळ | 325 |
| 89. | योगा' दीर्घायुषीरूपीपृथ्वीवरील अमृत | प्रा. डॉ. यशवंत सोनुने<br>सिध्देश्वर इंदरराव उगले | 328 |
| 90. | ज्ञानेश्वरीः संस्कृत गीतेचे प्राकृत नवनीत | प्रा. डॉ. सर्जेराव जिगे<br>प्रा. डॉ. एकनाथ शिंदे | 333 |
| 91. | संस्कृत साहित्यातील 'पीकशास्त्र' – विचार | प्रा.श्री.जयंत विनायक अभ्यंकर | 339 |
| 92. | वैदिक साहित्यात पर्यावरण संरक्षण | सविता चिटकलवार | 344 |

| | | | |
|---|---|---|---|
| 93. | कर्णभार नाटकातील कर्णाचे दान | सुतार सोनाली रंगनाथ | 349 |
| 94. | संस्कृत भाषेची निर्मिती व्याप्ती आणि महत्व | प्रा. नवनाथ ज्ञानोबा पवळे | 351 |
| 95. | योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य च वैद्यकेन। | डॉ.गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर | 353 |
| 96. | संस्कृतातील तत्सम तद्भव शब्द | प्रा. विजया दे. जगताप | 357 |
| 97. | अभिजात : शाकुंतलं सेव्यताम् | प्रा. जयश्री सुरजीलाल बनगे | 361 |
| 98. | ऋग्वेदातील सूक्तांमधून व्यक्त होणारे निसर्गप्रेम | प्रा. ओंकार रमेश पाठक | 367 |
| 99. | आरोग्यवर्धिनी तुळस | प्रा. सचिन कंदले | 370 |
| 100. | प्रवास मत्स्योपाख्यानाचा | डॉ. ओंकार शामसुंदर जोशी | 372 |
| 101. | कौटिल्याची चाणक्या निती आणि आजची व्यापार परिस्थिती | प्रा. डॉ. काळे डी. बी. | 375 |
| 102. | संस्कृत सुभाषिते व म्हणी | प्रा. डॉ. सौ. पौर्णिमा चंद्रकांत मोटे | 378 |
| 103. | संस्कृत भाषा व मराठी भाषा साम्यस्थळे | सुवर्णा बाबुराव कळसे | 381 |
| 104. | विज्ञान आणि अध्यात्म अद्वैत भाव : संस्कृत भाषेचे महत्व | स्वाती कुलकर्णी | 385 |
| 105. | मानव जीवन में योग का महत्त्व" | प्रा. डॉ. भारती एस. आर. | 389 |
| 106. | श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील कर्मविचार | स्वप्नील ठाकरे | 392 |
| 107. | गाथासप्तशती: एक अन्वयार्थ | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | 397 |
| 108. | यज्ञ : पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्य' | 402 |
| 109. | संगीत शाकुंतल'व 'अभिज्ञानशाकुन्तलम्' नाटकांमध्ये असलेले साम्यभेद | डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 405 |
| 110. | संस्कृत भाषा व मराठी भाषा उच्चारणशास्त्र | **Aditi Madhavan** | 411 |
| 111. | विभक्तीविचार संस्कृत व मराठी भाषेच्या संदर्भात | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | 416 |
| 112. | मानवी जीवनात योगाचे महत्त्व | डॉ.भगवान शंकरराव वाघमारे | 419 |
| 113. | संस्कृत व पाली भाषा सहसबंध | प्रा. बनसोडे जी.एस. | 422 |
| 114. | यज्ञ पद्धतीचा पर्यावरणावर होणारा परिणाम | डॉ. जगदाळे किरण आगतराव | 424 |
| 115. | अग्निहोत्र – वैज्ञानिक दृष्टीतून | अश्विनी गोविंदराव वडीकर | 427 |
| 116. | नाट्यशास्त्रात वर्णन केलेले नाट्यगृह - रचना व प्रकार | प्रा. एॅ. प्रज्ञा कोनार्डे<br>प्रा. सौ. कल्याणी आर्लेकर चामणीकर | 431 |
| 117. | भरतमुनीच्या नाट्यशास्त्राचा मराठी नाटकावर प्रभाव | प्रा. डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड | 437 |
| 118. | मराठी कीर्तन परंपरेवरील संस्कृत भाषेचा प्रभाव | वसुदेव पाटलोबा मुंडे | 440 |
| 119. | काश्यपीय कृषिसूक्तीवर्णित धान लागवडीच्या पद्धती | मंगेश पाठक | 445 |
| 120. | संस्कृत भाषेचा विज्ञावर असलेला प्रभाव | **Prakash Shantaram Khedlekar** | 452 |

# मानवी जीवनात योगाचे महत्त्व

डॉ. भगवान शंकरराव वाघमारे
लोकप्रशासन विभाग प्रमुख, अॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी जि. बीड.

**प्रास्ताविक:**

निरोगी शरीर ही व्यक्तीची सर्वश्रेष्ठ संपत्ती असून तिचे प्रत्येकाने संवर्धन करणे काळाची गरज आहे. शरीर तंदुरुस्त असेल तर मन तंदुरुस्त राहते, मन तंदुरुस्त असेल तर विचार प्रगल्भ बनतात आणि प्रगल्भ विचारातून मानवी जीवन सुधारले जाते. म्हणून मानवी जीवनात शरीराला अत्यंत महत्त्व दिले गेले. त्या शरीराचे योग्य संवर्धन होणे महत्त्वाचे आहे. आज एकविसाव्या शतकात मानवी जीवन अधिक धावपळीचे झाले असून आरोग्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होताना दिसून येते. प्रत्येकजण कोणत्याना कोणत्या समस्येने ग्रासलेला असून शारीरिक व मानसिक सुखाच्या शोधात असल्याचे दिसून येते. त्या सर्व समस्येवर परिणामकारक उपाय म्हणून योगासने योगासनाकडे पाहिले जाते. योगसाधना ही भारतातील पाच हजार वर्षे जुनी शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना असून ती शरीर व मनात परिवर्तन घडवून आणते. मन व शरीर निरोगी ठेवण्यासाठी योगा हा उत्तम पर्याय आहे.

मानवी शरीर, मन व बुद्धी निरोगी ठेवण्यासाठी योगा नियमित करणे आवश्यक आहे. योगासने नियमित व शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्यास आपले आरोग्य निरामय राहते. शरीर कार्यक्षम राहून अनेक व्याधींपासून मुक्तता मिळते. म्हणून मानवी जीवनात योगाचे अनन्यसाधारण महत्त्व दिसून येते. योगासनाचे विविध पद्धती विकसित झाल्या आहेत. व्यक्तीच्या गरजेनुसार योगा करून आपले अपेक्षित उद्देश साध्य करून घेता येईल. योगाच्या माध्यमातून शरीर लवचिक व कणखर बनते. त्यामुळे शरीर तंदुरुस्त राहून आत्मविश्वास वाढीस लागतो. योगासना द्वारे शरीरातील ग्रंथी आणि स्त्राव यांच्यावर योग्य ते नियंत्रण राहून दीर्घायुष्य लाभते. म्हणून योगासने हे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**योगासने करण्याच्या विविध पद्धती:**

**भुजंगासन:**

योगासने करण्याची भुजंगासन ही एक महत्वाची पद्धती आहे. छाती आणि शरीरातील मांसपेशी लवचिक बनवण्यासाठी तसेच कंबरेत आलेला तणाव दूर करण्यासाठी हे भुजंगासन अप्रतिम आहे. मेरूदंडसंबंधित आजारी व्यक्तींनी हे आसन केल्यास, त्याना याचा नक्कीच फायदा होऊ शकतो. शिवाय महिलांमध्ये गर्भाशयातील रक्ताभिसरण प्रक्रिया नियंत्रित करण्यासाठी देखील या आसनाची मदत होते.

**सूर्यनमस्कार:**

भारतात सूर्यनमस्काराची परंपरा अनेक पिढ्यांपासून सूरू आहे. सूर्य नमस्कार नियमित केल्यास अनेक आजार दूर होतील. लठ्ठपणाची समस्या असेल तर रोज कमीत कमी 10 वेळा सूर्य नमस्कार केल्यास तुमचं वजन कमी होईल. कारण सूर्यनमस्काराचे अनेक फायदे आहेत. रोज सूर्य नमस्कार केल्यास मनाची एकाग्रता वाढते, शरीराची लवचिकता वाढते, त्वचा उजळते, हाडं मजबूत होतात, पचनशक्ती वाढते आणि डोक्यातील तणावही दूर होतो.

**ध्यान:**

योगासनाची सर्वात प्रभावी पद्धती म्हणून ध्यानाकडे पहिले जाते. काही मिनिट्स जर ध्यान लावून तरी, मन आणि शरीरामध्ये प्रसन्नता संचारते. सकाळी ध्यान केल्यामुळे मन एका विशिष्ट दिशेने कार्यरत राहतं. तसंच पूर्ण दिवस मन एकाग्र, शांत आणि संतुलित राहातं. शिवाय दिवसभराच्या तणावपासून दूर राहण्यास मदत होते. त्यामुळे हा योगा अधिक महत्वाचा आहे.

**अर्धचक्रासन:**

मधुमेह अथवा साखरेचा कोणताही आजार वा पोटावरील चरबीपासून कमी करण्यासाठी अर्धचक्रासन हा उत्कृष्ट पर्याय आहे. याबरोबर हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे की, ज्या व्यक्तींना हाडासंबंधी कोणतीही गंभीर तक्रार असेल, त्या व्यक्तींनी हे आसन अजिबात करू नये आणि ज्या व्यक्तींना रक्तदाब अथवा मानसिक कोणताही आजार असेल त्यांनीही या आसनापासून दूरच राहावं. केवळ मधुमेह नियंत्रणात आणण्यासाठी या आसनाचा उपयोग होतो.

**पवनमुक्तासन:**

योगा करताना हे आसन केल्याने पोट सुडौल होते आणि कणा मजबूत होतो. पवनमुक्तासन हे एकमेव असं योगासन आहे जे पचन क्रिया दुरूस्त करतं आणि पोटाचे आजारही दूर करतं. मेटाबॉलिजम वेगाने करत शरीरातील अतिरिक्त चरबीही कमी करतं. तसंच गॅसच्या समस्यापासूनही सुटका करते.

**शलभासन:**

बऱ्याच व्यक्तींना पाठ आणि कमरेचा खूपच त्रास असतो. विशेषतः महिलांना गरोदरपणानंतर तर हा त्रास सर्रास होतो. या आसनामुळे कंबर आणि पाठीचे स्नायू मजबूत होतात. शिवाय पाठीमध्ये आणि कंबरेत कोणत्याही स्वरूपाचा त्रास होत असेल तर हे आसन तुम्ही रोज करायला हवं. हे रोज करून तुम्हाला स्वतःलाच स्वतःमधील बदल जाणवेल. वरील सर्व आसनाव्यतिरिक्त पर्वतासन, दंडासन, वक्रासन, सेतुबंधासन, श्वन संचालन आसन व हस्तपाद आसन इत्यादी योगासने नियमित करणे आवश्यक आहेत.

**योगासनाचे महत्त्व:**

योगा खरंतर प्रत्येकाच्या आयुष्यात महत्त्वाचं आहे. हा केवळ एक व्यायामाचा प्रकार नाही तर, यामुळे तुमच्या शरीराला एक योग्य कसरत होते. सध्याच्या धावपळीच्या जीवनात बाकी सगळं मिळतं पण आपण स्वतःच्या शरीराकडे अर्थात आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करत आहोत. व्यायामाचे, योगाचे आपल्या आयुष्यात खूपच महत्त्व आहे. रोज योगा केल्याने ताणतणावपासून दूर राहतो. तसेच म्हातारपणात आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी योगा महत्वाचा आहे.. इतकंच नाही तर माणसाचे वजन, हाडं, मांसपेशी आणि सांधेदेखील दणकट राहातात. योगामुळे शरीरामध्ये ऊर्जा निर्माण होते. शिवाय तुम्ही नियमित योगा केलात तर कोणत्याही आजारापासून तुम्ही दूर राहू शकता. पण त्यासाठी ही गोष्ट नियमित करणं आवश्यक आहे. योगामुळे रक्तदाबदेखील नियंत्रणात राहातो. त्यामुळे योगा हा बऱ्याचशा आजारांना दूर ठेवतो जे जास्त महत्त्वाचं आहे.

**आंतरराष्ट्रीय योगा दिन:**

संयुक्त राष्ट्राने २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. भारताच्या नेतृत्वाखालील १७५ देशांच्या प्रतिनिधींकडून हा प्रस्ताव करण्यात आला होता. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेतही हा प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात

आली आहे. या प्रस्तावात योगासनांचे फायदे आणि त्याचे आरोग्यावरील परिणाम यांचे विस्तृत विवेचन करण्यात आलेले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधी लाभले आहेत. प्रथमच एखाद्या प्रस्तावाला एवढ्या देशांचे सहप्रतिनिधी लाभले. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रातील सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका हे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. जगात योगा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. योगासनाचे महत्व अनेक राष्ट्रांना पटलेले आहे. त्यामुळे उत्तम आरोग्यासाठी योगा हा एकमेव पर्याय असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात योगासनाचे योगासनाचे विशेष महत्व अधोरेखित होते. एकंदरीत योगामुळे व्यक्तीचा बौद्धिक, नैतिक, मानसिक, सामाजिक, भावनिक व शारीरिक विकास होतो. यामुळे आरोग्य निरोगी व चैतन्यशील बनते. योगासनामुळे सामाजिक स्वास्थ्य उत्तम राखल्या जाते. योगाच्या सानिध्याने मानवाच्या दैनंदिन क्रिया सुधारून अंतर व बाह्य असे बदल घडून येतात. विविध आसने व प्राणायाम याद्वारे संपूर्ण जीवन बदलून जाऊ शकते. त्यामुळे जीवन आंनदी – उत्साही व निरोगी बनविण्यासाठी एकविसाव्या शतकात योगाची नितांत आवश्यकता आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर योगाचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार होताना दिसून येतो.

**संदर्भ सूची:**


1. Yadav V.P. and Yadav Rachana, Yoga for life, Friends publication, Delhi.1998.
2. Yoga: Yogasana and Pranayama, Dr.P.D.Sharma, Publisher:Navaneet Publication.
3. https://aajtak.intoday.in/story
4. https://hindi.webdunia.com

mail

Search mail

7 of 685

101

ng

ting

# Publication for Research paper for Conference

Inbox ×

**Sachin Kandale**

Tue, Oct 27, 2:39 PM (13 days ago)

to poojaj1197, mangeshdjadhav12, vasudevmundeshastri111, ksunil.kale, dtp, swapnil19211, sarane1320, Surekha, ramchandrashinde310197, aditAp95, Na:

Marathi > English Translate message

Turn off for: Ma

नमस्कार सर / मॅडम

"संस्कृत - मराठी ऋणानुबंध"

आपला रिसर्च पेपर जो की आपल्या बीड च्या कॉन्फरन्स मध्ये प्रकाशित झाला आहे.
तो खालील वेबसाईटवर आपणास पहावयास मिळेल।

www.widrj.com

तरी सर्वांनी या वेबसाईटवर भेट देऊन आपला पेपर डाउनलोड करून घ्यावा।

संस्कृत विभाग,
स्वा सावरकर महाविद्यालय, बीड

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

SRJIS

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL JUNE,2021, VOL- 10, ISSUE-47

## Special Issue of Mahatma Jyotiba Phule, Mahavidyalay, Mukhed



**Editor In Chief**

**Dr. Adkine Shivanand Baliram,**

Principal

Veerbhadra Education Society's

Mahatma Jyotiba Phule Mahavidyalaya, Mukhed

Tq.Mukhed Dist.Nanded (MS)

NAAC Re-Accredited With "B"Grade

# "चिरंतन महात्मा बसवेश्वर"


## मुख्य-संपादक

प्राचार्य डॉ.अडकीणे शिवानंद बळीराम

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, .नांदेड

## संपादक

प्रा. डॉ. कहाळेकर चांदोबा मरीबा

लोकप्रशासन विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि.नांदेड

### सह-संपादक

डॉ.मंगनाळे संतोष कल्याणराव

भूगोल विभाग,

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

मुखेड जि.नांदेड

### सह-संपादक

श्री.गजमल अर्जुन वंझे

ग्रंथपाल,

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

मुखेड जि.नांदेड

| | | |
|---|---|---|
| 28 | महात्मा बसेश्वर यांचा "कायक वे कैलास" सिद्धांताचे महत्व<br>*वाकडकर महेश गणपतराव* | *98-99* |
| 29 | संत ज्ञानेश्वर व महात्मा बसवेश्वर यांचे तत्वविचार<br>*डॉ. आहेर दिलीप किसन* | *100-104* |
| 30 | महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या वचन साहित्याचे महत्व<br>*प्रा. डॉ. प्रकाश डी. राठोड* | *105-106* |
| 31 | आंतरजातीय विवाहाचे अध्य पुरस्कर्ते:: महात्मा बसवेश्वर<br>*प्रा. उमाकांत शिवदास चलवदे* | *107-109* |
| 32 | महात्मा बसवेश्वर: परिवर्तनीय योद्धा<br>*डॉ.कहाळेकर सी.एम.* | *110-113* |
| 33 | MAHATMA BASWESHWAR: FATHER OF SOCIAL REVOLUTION<br>*Dr. Hatode Kirtiratna B.* | *114-115* |
| 34 | समतावादी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर<br>*डॉ.केरबा कांबळे* | *116-117* |
| 35 | मानवी हक्क आणि जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे तत्व<br>*प्रा. डॉ. कलवले गोविंद केरबा* | *118-120* |
| 36 | महात्मा बसवेश्वरांनी स्थापित केलेल्या लिंगायत धर्माचे तत्वज्ञान<br>*प्रा.डॉ. बी.एन. नागलगावे* | *121-124* |
| 37 | वचन साहित्याचा शोध व बोध<br>*श्री.अर्जुन बंडू गजमल* | *125-128* |
| 38 | महात्मा बसवेश्वरांचे क्रांती,परिवर्तनात्मक कार्ये<br>*प्रा. डॉ. भगवान शंकरराव वाघमारे & प्रा.डॉ.संजय भालेराव* | *129-131* |
| 39 | आद्य समाजसुधारक- महात्मा बसवेश्वर<br>*प्रा. डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी* | *132-134* |
| 40 | महात्मा बसवेश्वरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन व कार्ये<br>*प्रा.डॉ. शिवाजी किशनराव बल्लोरे* | *135-138* |
| 41 | महात्मा बसवेश्वरांचे स्त्री विषयक विचार व कार्य<br>*प्रा. डॉ. पाटील बी.टी.* | *139-140* |
| 42 | BASAVESHWAR'S PHILOSOPHY HUMANITY ON SOCIAL REFORMS" 'AND SOCIAL EQUITY<br>*Dr. B.V. Halmandge* | *141-149* |

# महात्मा बसवेश्वरांचे क्रांती,परिवर्तनात्मक कार्ये

**प्रा. डॉ. भगवान शंकरराव वाघमारे**
*लोकप्रशाशन विभाग प्रमुख ॲड . बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी जि. बीड*
**प्रा. डॉ. संजय भालेराव**
*लोकप्रशाशन विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद*

**प्रस्तावना** - बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर - बागेवाडी या गावात 1105 साली प्रतिष्ठीत पशुपात शैव कम्मेकुलातील एका कुटूंबात जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर जि.विजापूर या गावी झाला असावा असे मत आहे. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद, असलेतरी सामान्यत;त्यांचा जन्म 25 एप्रील 1105 वैशाख शुध्द तृतीया अक्षय्य तृतीया दिवशी महात्मा बसवण्णांचा जन्म झाला. त्यांचे वडीलमदिराज आणि आईचे नाव मादलांबीका हे होते. भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्ण व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडल संगम येथे गेले, ते पशुपात शैवांचे प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्ष वास्तव्य केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेंव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे वास्तव्य केले.

**महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्ये -**

1) **पाचही सूतके पाळू नका** - स्त्रियांच्या मासिक पाळीत जो स्त्राव पाझरतो तो स्त्री ही प्रजननासाठी सक्षम आहे त्याचे घोतक आहे. मातृत्वाशक्ती गौरवांकीत करणारा विटाळ हा अपवित्र कसा असू शकतो? म्हणून बसवेश्वर म्हणतात ऋतुस्नात, विटाळशी, रजस्वलेला अस्पृश्य समजू नये. तसेच इतर जातींचा विटाळ, उष्टे खाण्याचा विटाळ, मृत्युचा विटाळ, जन्माचा विटाळ ही पाचही सूतके पाळू नयेत. मात्र स्वच्छता ठेवावी व काळजी घ्यावी.

2) **संन्यास घेऊ नये, भिक्षावृत्तीचा निषेध** - इंद्रिय दमनाने विषय विकार वाढतात. चांगल्या विचार-भावनावर दाबलेले विषय विकार कुरघोडी करतात. म्हणून तारुण्य आल्यावर विवाह करावा, परंतू आजन्म अविवाहीत राहणे, परमेश्वर प्राप्तीसाठी संन्सास घेणे, सर्वसामान्य व्यक्तीसाठी योग्य नव्हे. ज्यांच्या आपल्या विकारांवर ताबा आहे, योग बळाने ज्यांना मनाला नियंत्रित करता येते, अशा निग्रही, ध्येयवादी, सिध्दीप्राप्त योगींनी समाजाच्या कल्याणासाठी सन्यास व्रत अवश्य धारण करावे. एखाद्या चांगल्या समाज कार्यासाठी उच्च ध्येय प्राप्तीसाठी समर्पित भावनेने कार्य करावयाचे असेल अशांनी अविवाहित राहून संन्याशी जीवन जगावे. बसवेश्वरांनी संन्यास घेणे बंधनकारक न ठेवता ऐच्छिक ठेवलेले आहे. संन्यास घेतल्याने पत्नी व मुले यांच्यावर अन्याय होतात, भिक्षा मागतात म्हणून भिक्षा मागून जगणा-यांचा त्यांनी निषेध केलेला आहे.

3) **एकदेव उपासना** - बाराव्या शतकाच्या काळात समाजातील लोक अनेक-अनेक देव देवींची उपासना करीत. हे कमी वाटले म्हणून अग्नी, पृथ्वी, सुर्य, चंद्र, जलदेवता, कुळदेवता, दशावतार, गणेण, काली, यल्लम्मा, रेणुकांबा इतकेच काय तर कुत्रा वानर, नाग, वाघोबा, गाय-बैल, मुंग्या हे प्राणी तसेच भिंती , गढ्या, किल्ले, विहरी, शेते, झाडे, नद्या-नाले यात राहणारे भूत-पिशाच्च, मैलार, मल्हारी, खंडोबा, मरीआई, मुंग्या, मातामाय इत्यादिची पुजा करीत.

समाजातील ही अनेक देवांची उपासना करणे म्हणजे एकाही देवावर विश्वास नसल्या सारखे आहे. मग एकही देव प्रसन्न होणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी एकाच देवावर विश्वास ठेवणारी भक्ती करा असा उपदेश केला.

**4) स्वर्ग-नरक विश्वात कोठेही नाही** - देवलोक, मृत्युलोक ह्या दोन्ही वसाहती आकाशात कोठेही नाहीत. जेथे सत्य, शील, करुणा, माणुसकी आहे तेथेच साक्षात स्वर्ग नांदतो आणि जेथे अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आहे तोच नरक आहे. सदाचारच स्वर्ग आणि अनाचारक नरक होय.

**5) अंधश्रध्दा नाहिशा केल्या** - बसवेश्वर म्हणतात, देवाला प्रसन्न करण्यासाठी मुक्या प्राण्यांचे बळी देऊ नका. होम हवनात गरिबांना न मिळणारे दुध, तुप, दही, लोणी, वस्त्रे, टाकू नका. व्रत, वैकल्ये, नवस प्रायश्चिताचे विधी, उपास-तपास करुन शरीराला कष्ट देवू नका. देवदेवतेला पोटच्या मुली अर्पण करुन त्यांना देवदासी, जोगतीणी, भावीण, गणिका, मुरळी, आराधिनी, कसबिणी करु नका.

**6) पाप-पुण्याच्या कल्पना मानवाला निष्क्रीय करतात** - आपल्या नशिबी आलेली दु:खे, संकटे, मंदबुध्दी, दारिद्य हे मागच्या जन्मीच्या पापाचे फळ आहे ते म्हणे ब्रम्हलिखीत असते. ते अपरिवर्तनीयच असते. यावरच्या विश्वासामुळे श्रध्दाळू माणूस या जीवनात कोणतेही परिश्रम, प्रयत्न व साहस करीत नाही. कारण कितीही प्रयत्न केले तरी ब्रम्हलिखीत बदलणारच नाही तर प्रयत्नच कशाला करावा? परिणामी माणूस आत्मविश्वास गमावून निष्क्रीय होतो. मग इतर सुलभ मार्गाने म्हणजे गुप्तधन कसे मिळेत, जुगारातुन पैसे कसे मिळतील असे विचार त्याच्या मनात निर्माण होतात. म्हणून पाप-पुण्याच्या कल्पना झुगारुन द्यावयास पाहिजे. परिश्रमामुळेच आपले जीवन बदलू शकते यावर प्रत्येकाचा विश्वास असावा.

**7) पुनर्जन्माचे आमिष दाखविले नाही** - समाजात हा गैरसमज पसरविण्यात आलेला आहे की, सध्या मिळालेले जीवन हे मागच्या जन्मीचे पाप आहे. पुढच्या जन्म वैभव संपन्न घरात घ्यावयाचा असेल तर पुण्य गोळा करण्यासाठी व्रतवैकल्ये, उपवास करा. तीर्थयात्रा, नद्यात स्थान, सुवर्णदान, गोदान, भूमीदान, दानधर्म करा, देवळे बांधा, या जन्माची कर्मफळे पुढच्या जन्मात भोगावी लागतात. यालाच कर्मविपाक सिध्दांत म्हणतात. बसवेश्वरांना हे मान्य नाही. त्यांनी स्वर्गाचे अमिष व नरकाची भिती दाखवली नाही. बसवेश्वरांना मेल्यानंतरच्या जीवनाच्या केलेल्या कल्पना मान्य नाहीत.

**8) पृथ्वीलाच स्वर्ग बनवू या** - आपण जन्मालो ते हे दिसणारे अनुभवास येणारे जग खोटे नाही. मिथ्या किंवा लटके नाही. म्हणून आपण राहातो त्या पृथ्वीवरच घाम गाळून परिश्रम करुन सुखे निर्माण करु या असा भौतिकवादी, इहजीवनवादी विचार बसवेश्वरांनी मानवजातीला दिलेला आहे. स्वर्गाचे आमिष, प्रलोभन व नरकाची भीती त्यांनी लोकांना दाखबली नाही. कायक करण्याचे श्रम केल्यानेच पृथ्वीचा स्वर्ग होऊ शकतो हा मानवतावादी विचारच लोकांना सुखात ठेवू शकतो.

**9) शकून-अपशकून, तिथी, नक्षत्रे यावर विश्वास ठेवू नका** - शकून-अपशकून, मांजर आडवी गेली, तारा निखळला, कावळा ओरडला, मध्यरात्री कुत्रा वेल्हाळला, पाल चुकचकली, घुबडाचा घुघुत्कार यावर विश्वास ठेवू नये.लग्न जुळवितांना आई-वडील, नातेवाईक वधु-वर शरण यांना जे मान्य तोच शुभयोग समजावा. राशीकुट, गुण, ग्रह, नक्षत्रे, जुळली आहेत असे समजावे.

**10) गुन्हेगारांना सभ्य समाजात आणले** - जन्मत: सर्वच लोक निष्पाप व चांगले असतात, परंतू वाईट मित्रांच्या संगतीमुळे, दारिद्रयामुळे, रोजच्या गरजा पुर्ण न झाल्यामुळे, पोटच्या भुकेमुळे, आपल्यांना खायला मिळत नसल्यामुळे स्त्रिया-पुरुष अनैतिक व्यवसायाकडे वळून चोर, गुन्हेगार बनतात, मुली देवदासी, मुरळया, वैश्या बनतात. त्यांना चांगले समजाविले, उपदेश केला (समुपदेशन) चांगले वागविले तर वाईट लोकही सभ्य होऊन प्रतिष्ठीत चांगले जीवन जगू शकतात यावर बसवेश्वरांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी दारु गुत्तेदार मारय्या, गायचोर उरिलिंगपेद्दी, काश्मिरचा मारेकरी चिक्कय्या, संकव्वा (पुर्वायुष्यातील वेश्या) यांना सभ्य समाजात आणून कायक (कर्म) करण्यास दिले आणि अनुभव मंटपाचे सदस्य केले.

**11) नागिदेव कांवळे या अस्पृश्याकडे भोजन -**

महामंत्री बसवेश्वर समाजातील शुद्र समजल्या जाणा-यांच्या घरी जात. त्यांचे भोजन प्रसाद स्वीकारित असत. वसवेश्वरांच्या आचरणाने व कृतीने प्रभावित होऊन अनेक शुद्रांनी अनेक देवांची पुजा सोडून इष्टलिंग भक्ती

स्वीकारली. एक दिवस नागिदेव कांबळे या अस्पृश्यानेही त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. गावकुसाबाहेरची अनेक स्त्री-पुरुष मंडळी सहभागी झाली होती. कर्मठ लोक वाकून खात्री करुन घेऊ लागले. बसवेश्वरांनी दुर्लक्ष केले आणि जमलेल्या स्त्री-पुरुषांना इष्टलिंग भक्ती स्विकारण्यास सांगितले. रोज अनुभव मंटपात यावयास सांगितले. बसवेश्वराने अस्पृश्य नागिदेव कांबळे यांच्याकडे भोजन करुन आपल्या कृतीतून व आचारातून समाजात जातीभेद पाळू नका असा चांगला संदेश दिला.

12) **स्त्रियांना स्वातंत्र्य -** स्त्रियांना शिक्षण घेण्याचा, दिक्षा घेण्याचा, संपत्ती घेण्याचा, राजसत्ता सांभाळण्याच्या, पतीची निवड करण्याचा, विधवांना विवाहाचा, घटस्फोटाचा हे सारे अधिकार नव्हते. स्त्रियांची संपत्ती सारखी देवाणघेवाण होई. कर्मठ लोकांनी तिला व्रतवैकल्ये, उपासतपास इतर कर्मकांडातच आजन्म गुंतवून ठेवले.

बसवेश्वरांना या गुलामी प्रथेची कल्पना होतीच. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही मन, भावना, बुध्दी, शक्ती असते याची जाणीव असल्यामुळे तिला विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. स्त्रियांची पाचही सुतकातून मुक्ती केली. अनुभव मंटपातील स्त्रियांना लिहिणे, वाचणे शिकवून साक्षर केले. जे वाटते ते मत अनेक स्त्री-पुरुषांच्या समोर हिमतीने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. स्त्रिया वाद-विवादात सहभागी होऊ लागल्या. स्वाभिमानाने आपले विचार वचन काव्यातून व्यक्त करु लागल्या. अर्थार्जनाची कामे (कायक) करु लागल्या. बसवेश्वरांनी बाल विवाहाला विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाहाला, विधवांच्या विवाहाला प्रोत्साहन दिले. कल्याण क्रांतीत वचन साहित्याला राज्याच्या सैनिकांनी आग लावल्यावर त्यातून बरेच वचन साहित्याचे गठ्ठे सातशे किलोमीटर अंतरावरील डोंगर कपारीत दुर्गम जंगलात उळवी (जि.उत्तर कन्नड) येथे सुरक्षित नेले. केवढी ही वचननिष्ठ व ज्ञाननिष्ठा अनुभव मंटपातील अनेक स्त्रियांनी विविध प्रकारचे उद्योग, व्यवसाय सुरु केलेले होते. उदा : सूत कातणे, सौंदर्य प्रसाधने विकणे, धान कोंडणे, तेलघाणी चालविणे, सुतार काम, स्त्री-पुरुषांना लिहणे-वाचणे शिकविणे, ज्ञानदान करणे इ.बसवेश्वरांनी स्त्रियांना स्वावलंबी, कर्तव्य कठोर व स्वाभिमानी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

**सारांश -** भेदभावामध्ये होरपळलेल्यांचा आणि गरिबीत खितपत पडलेल्यांचा कैवारी होणे होय. मानवांच्या घनतेस (श्रेष्ठत्वास) उचलून धरणे होय. सर्व प्रकारच्या भेदभावांच्या निर्मूलन कार्यात सहकार्य करणे होय. या पृथ्वीस सकल जीवात्म्यांचे महाविवास व माहेर होण्यालायक करणे होय. कायकाव्दारे अर्थात शरीरिक श्रमामुळे येणारे अनुभव आणि आपल्या सारखेच इतरांना समजण्यासाठी दासोह करणे. या सा-यातून अनुभवासंगे समाधानाने जगणे होय. असे महात्मा बसवेश्वरांचे क्रांतीकार्य दिसून येते.

**संदर्भग्रंथ -**

*डॉ. अशोक ग. मेनकुदळे : महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद भालकी, तीसरी आवृत्ती - 2019.*
*डॉ. राजेश्वर सोलापुरे : लिंगायत एकस्वतंत्र धर्म, अरुणा प्रकाशन, लातूर - 2013*
*डॉ. सुर्यकांत घुगरे : जगत्ज्योतीबसवेश्वर, महाराष्ट्र बसव समिती, नांदेड - 2003*
*रमजान दर्गा : बसवेश्वरांचा विश्वसंदेश, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी, सातवी आवृत्ती - 2018*
*प्रा. भिमराव ब्रम्हाजीराव पाटील : ऐतिहासिक बसकल्याण पर्यटन मार्गदर्शिका, शरण साहित्य मंडळ लातूर - 2014*
*डॉ.एच.थिप्पेरुद्र स्वामी : बसवेश्वर, साहित्य अकॅडमी, नई दिल्ली - 1982*
*दुर्गा भागवत : धर्म आणि लोक साहित्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - 1975*
*भगत रा. तु. : संत साहित्य आणि अंधश्रध्दा निर्मुलन, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर - 2002*